१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, शुक्रवार १५ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३५, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 235 Marathi - Daily - Pune, 15 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
HPCL चा रेकॉर्डब्रेक नफा, पण महागाई कमी कधी होणार?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### सीएनजी दरात २ रुपये वाढ मुंबईत नवा दर ८४ रुपये

**मुंबई -** आखाती युद्ध आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा आणखी एक फटका मुंबईकरांना बसणार आहे. महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ




जाहीर केली आहे. मुंबईतील सीएनजीचा दर ८२ रुपयांवरून ८४ रुपये प्रति किलो झाला आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात हे नवे दर आजपासून लागू झाले आहेत. त्यामुळे सुमारे १२.८० लाख वाहनचालकांना या दरवाढीचा फटका बसणार आहे. एमजीएलच्या माहितीनुसार, पश्चिम आशियातील वाढता तणाव, विशेषतः इराण-इस्रायल संघर्ष, यामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. परिणामी गॅस खरेदीचा खर्च वाढला असून, त्याचा थेट परिणाम सीएनजी दरांवर झाला आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे येत्या काळात पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### एव्हरेस्ट पर्वतारोहण हंगामाला सुरुवात

**काठमांडू -** एव्हरेस्ट पर्वतावर चढाई करण्यासाठी इच्छुक गिर्यारोहकांसाठी एव्हरेस्ट चढाईचा हंगाम आता अधिकृतपणे सुरू झाला आहे. काल ११ प्रशिक्षित गाईडनी



एव्हरेस्टवर दोरखंड बांधत काल सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी शिखर सर केले. त्यानंतर नेपाळच्या पर्यटन विभागाने गिर्यारोहणाचा हंगाम सुरू झाल्याची घोषणा केली. नेपाळचा पर्यटन विभाग दरवर्षी एव्हरेस्ट पर्वतावर दोरखंड बांधण्याचा कार्यक्रम हाती घेते. त्यानंतर गिर्यारोहणाचा हंगाम सुरू केला जातो. या दोरखंडाच्या सहाय्याने गिर्यारोहकांना एव्हरेस्ट चढाई करणे काहीसे सुलभ होते.

### आझाद मैदानावर १८ मेपासून परिचारिकांचे आंदोलन

**मुंबई -** आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि राज्य सरकारच्या जिल्हास्तरीय बदलीच्या धोरणाविरोधात सरकारी रुग्णालयातील ३० हजार परिचारिका १८ मेपासून आझाद मैदानावर आंदोलन छेडणार आहेत. १८ ते २० मे असे तीन दिवस हे आंदोलन करण्यात येणार आहे. दीर्घकाळ रिक्त असलेली पदे भरणे, कंत्राटी पदभरती रद्द करणे, भत्यांमध्ये वाढ करणे, पदोन्नती आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षितता अशा अनेक मागण्यांसाठी परिचारिका २०१९ पासून संप, निदर्शने आणि निवेदनांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहेत. मात्र सरकारशी अनेकदा चर्चा करूनदेखील परिचारिकांना केवळ आश्वासनाशिवाय काहीही मिळालेले नाही, असे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे म्हणणे आहे. जिल्हा स्तरीय बदल्यांच्या धोरणामुळे परिचारिकांना कौटुंबिक जबाबदारी, मुलांचे शिक्षण आणि परजिल्ह्यातून प्रवास करणे यांसारख्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे हे धोरण रद्द करावे, अशी आमची मागणी आहे, असे संघटनेच्या सरचिटणीस सुमित्रा टोटे यांनी सांगितले.

# मंत्र्यांचा इंधनबचतीचा दिखावा! फडणवीसांचा बुलेट प्रवास

# पीयूसी कालबाह्य! काँग्रेसचा आरोप! भाजपाचा पलटवार

■ मुंबई



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील वाढत्या इंधन तुटवडा आणि ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर काटकसरीचे आवाहन करताच महाराष्ट्रातील आणि केंद्रातील भाजपाचे मंत्री व नेत्यांनी इंधनबचतीला सुरुवात केली. जनतेने मात्र हा निव्वळ दिखावा असल्याची टीका केली.**

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी बुलेट मोटारसायकलवरून वर्षा निवासस्थान ते विधान भवन असा ५ मिनिटांचा प्रवास केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली. त्यांनी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला. नितेश राणे थोडेसे अंतर पायी चालत गेले. हा इंधनबचतीचा दिखावा किती दिवस चालणार, असा प्रश्न सामान्यजनांना पडला असतानाच मुख्यमंत्र्यांच्या दुचाकी प्रवासाचे फोटो समाज माध्यमावर प्रसिद्ध करत काँग्रेस नेत्या खा. वर्षा गायकवाड यांनी त्यांच्या दुचाकीचे पीयूसी (प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र) कालबाह्य झाले असल्याची पोस्ट केली. शरद पवार यांनीही पत्रकार परिषदेत या इंधन बचतीच्या प्रकारांवर टीका केली.

आज विधान भवनात विधान परिषदेवर नियुक्त १० आमदारांचा शपथविधी होता. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळी आपल्या वर्षा निवासस्थानातून निघाले तेव्हा त्यांच्याबरोबर नेहमी असतो तसा मोटारीचा ताफा नव्हता. रॉयल एनफिल्ड ३५० बुलेटवर स्वार होऊन त्यांनी आपला प्रवास सुरू केला. त्यांच्या दुचाकीवर मागे त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार बसले होते. विशेष म्हणजे, केवळ मुख्यमंत्रीच नव्हे, तर त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेला ताफादेखील यावेळी सात दुचाकीवरून त्यांच्या मागे जाताना दिसला. फडणवीस म्हणाले की, मोदी यांनी केलेले आवाहन देशहितासाठी केले आहे. त्याला आपल्या परीने सहकार्य करावे, यासाठी आम्ही आज दुचाकीवरून प्रतिकात्मक प्रवास केला. यातून जनजागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही आमच्या ताफ्यातील गाड्यांची संख्याही निम्मी करणार आहोत. तसेच पुढचे सहा महिने कुठलेही मोठे कार्यक्रम आयोजित करणार नाही. जे याला विरोध करीत आहेत ते बिनडोक आहेत. त्यांच्या या शब्दांना नंतर शरद पवारांनी आक्षेप घेतला.

मुख्यमंत्र्यांनी इंधनबचतीसाठी केलेला हा प्रवास संपल्यानंतर, काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी एक्सवर या प्रवासाचे फोटो आणि त्या बाईकच्या पीयूसी स्टेटसचे स्क्रीनशॉट शेअर केले. या दुचाकीच्या पीयुसीची मुदत जानेवारी २०२५ मध्येच संपल्याचे त्यात स्पष्टपणे दिसत होते. काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवर टीका करताना, 'एक्स्पायर्ड माल' असा शब्द वापरला होता. वर्षा गायकवाड यांनीही तोच धागा पकडत मुख्यमंत्री फडणवीसांवर निशाणा साधत, हा 'एक्स्पायर्ड माल' चालतो का? असा सवाल केला. विरोधकांनी मुख्यमंत्र्यांच्या या उपक्रमाला 'स्टंटबाजी' म्हणत मुंबई आरटीओ आणि मुंबई पोलिसांकडे कारवाईची मागणी केली.

यानंतर भाजपाचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी खा. गायकवाड यांच्यावर पलटवार करत म्हटले की, वर्षाताई, सदर वाहन हे पोलीस विभागाचे आहे. ते स्वतः मुख्यमंत्री महोदय चालवणार असल्याने पोलिसांनी योग्य खबरदारी आधीच घेतली होती. काल त्याची

पान ७ वर

## राहुल गांधींचे ५४ परदेश दौरे

### खर्च कुणी केला? भाजपाचा सवाल



**भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून जोरदार हल्लाबोल करत प्रश्न उपस्थित केला. त्यांनी दावा केला की, राहुल गांधींनी गेल्या २२ वर्षांत तब्बल ५४ परदेश दौरे केले असून, त्यावर सुमारे ६० कोटी रुपये खर्च झाले. याशिवाय गेल्या दहा वर्षांत राहुल गांधींचे घोषित उत्पन्न फक्त ११ कोटी रुपये आहे. मात्र त्यांचा खर्च ६० कोटी झाला. त्यामुळे कमाईपेक्षा इतका मोठा खर्च नेमका कुणाच्या पैशातून झाला, असा सवाल उपस्थित केला.**

■ नवी दिल्ली

**संबित** पात्रा म्हणाले की, राहुल गांधी यांनी इटली, युनायटेड किंगडम, अमेरिका, जर्मनी, व्हिएतनाम, कंबोडिया, सिंगापूर, बहरीन, मालदीव, कतार, संयुक्त अरब अमिराती, ओमान आणि मस्कतसह अनेक देशांना भेटी दिल्या. काही दौरे जाहीर झाले. मात्र अनेक दौरे अघोषित झाले. ३ मे २०२६ रोजी व्हायरल झालेल्या फुटेजमध्ये राहुल गांधी मस्कत आणि ओमान दौऱ्यावर असल्याची माहिती आहे. हा दौरा अधिकृत नव्हता. याशिवाय २०१३-१४ ते

पान ७ वर

## जंतरमंतर रोडवरील बंगला आमचा! काँग्रेसची याचिका

नवी दिल्लीतील ७, जंतरमंतर रोड या बंगल्याच्या मालकीसाठी काँग्रेसने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी न्यायालयाने सरकारला नोटीस बजावली आहे. १९४७ ते १९७१ पर्यंत हा बंगला काँग्रेस पक्षाचे मुख्यालय होता. काँग्रेसने याचिकेद्वारे असा दावा केला आहे की, भारत सरकारने १९५६ मध्ये ७, जंतरमंतर रोड हा बंगला काँग्रेसला ६ लाख १० हजार ७०० रुपयांना विकला. पूर्ण पैसे दिले असताना गेली सहा दशके या बंगल्याचे अभिहस्तांतरण सरकारने केलेले नाही.

पान ७ वर

## इराण परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची भारतात दाखल

■ नवी दिल्ली

**भारताच्या** अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या ब्रिक्स इंडिया-२०२६ या परिषदेच्या निमित्ताने इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आज भारतात दाखल झाले. भारत मंडपममध्ये झालेल्या या कार्यक्रमामध्ये अराघची यांनी हजेरी लावली.

या परिषदेला रशिया, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, इजिप्त आणि इथिओपियासह ब्रिक्सचे अनेक सदस्य देश व भागीदार देशांचे परराष्ट्र मंत्री उपस्थित होते. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी हे बीजिंगमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीत व्यग्र असल्याने ते या बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्याऐवजी चीनचे राजदूत शू फिहोंग हे बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत मध्य पूर्वेतील इराण-अमेरिका युद्ध, त्यामुळे निर्माण झालेले इंधन संकट आणि हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## अश्लील व बेकायदेशीर मजकुरावरून गुगल-ॲपलला न्यायालयाची नोटीस

■ नवी दिल्ली

**गुगल** प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध असलेल्या काही मोबाईल ॲप्लिकेशन्सद्वारे अश्लील मजकूर प्रसारित केला जात असून, इतर कथित बेकायदेशीर कृत्यांना प्रोत्साहन दिले जात असल्याचा आरोप करत



नागरिक रुबिका थापा यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेची दखल घेत दिल्ली उच्च न्यायालयाने गुगल एलएलसी, ॲपल इंक आणि संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे.

याचिकेत आरोप करण्यात आला आहे की, काही ॲप्सद्वारे अश्लील मजकुराचा प्रसार होत आहे. अनैतिक मानवी तस्करी, वेश्याव्यवसाय, अमली पदार्थ सेवन आणि अवैध शस्त्रास्त्र व्यापारास प्रोत्साहन दिले जात आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० आणि भारतीय न्याय संहिता, २०२३ चे उल्लंघन करण्यात आले आहे. अनेक कंपन्यांचे सर्व्हर परदेशात असल्याने कारवाईत अडथळे येत आहेत.

न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. तेजस कारिया यांच्या खंडपीठाने संबंधित पक्षांना योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश देत जुलैमध्ये होणाऱ्या पुढील सुनावणीपूर्वी कारवाई अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. न्यायालयाने नमूद केले की, माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, २०२१ अंतर्गत ॲप स्टोअर चालवणाऱ्या मध्यस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

## विधान परिषदेच्या नवनिर्वाचित १० आमदारांनी शपथ घेतली

■ मुंबई

**विधान** परिषदेवर विधानसभा सदस्यांद्वारे द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या नऊ सदस्य आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या प्रज्ञा सातव अशा १० नवनिर्वाचित सदस्यांचा विधान भवनात आज शपथविधी सोहळा पार पडला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधान परिषदेच्या या नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली.

भाजपाचे प्रमोद जठार, सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रज्ञा सातव, शिंदे गटाच्या डॉ. नीलम गोऱ्हे व बच्चू कडू, उबाठाचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राष्ट्रवादीचे झिशान सिद्दिकी यांनी विधान परिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारदेखील उपस्थित होत्या. आमदार झिशान सिद्दीकी यांनी इंग्रजीमधून आमदारकीची शपथ घेतली. १२ मे रोजी विधान परिषदेच्या या १० जागांसाठी निवडणूक होणार होती. परंतु १० जागांसाठी १० उमेदवारांनीच अर्ज दाखल केल्यामुळे महाराष्ट्रातील विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये भाजपाच्या ६, शिवसेना शिंदे गटाच्या २, राष्ट्रवादी अजित पवार गटाचा १ आणि उबाठा गट (महाविकास आघाडी) च्या एका उमेदवाराचा समावेश आहे. महाराष्ट्र विधान परिषदेची एकूण सदस्यसंख्या ७८ आहे.

## पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरण निकाल १६ जूनपर्यंत लांबणीवर

■ मुंबई

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**काँग्रेसचे** नेते पवनराजे निंबाळकर यांच्या हत्या खटल्याचा निकाल आज पुन्हा लांबणीवर पडला. या खटल्यातील आरोपी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि पवनराजेंचे चुलत बंधू पद्मसिंह पाटील आणि पवन शुक्ला यांनी प्रकृतीच्या कारणास्तव न्यायालयात हजर राहण्यास असमर्थता दर्शविल्याने न्यायालयाने निकाल १६ जूनपर्यंत लांबणीवर टाकला. या दिवशी सर्व आरोपींनी न्यायालयात हजर राहावे, असे न्यायालयाने बजावले आहे. ३ जून २००६ रोजी पवनराजे निंबाळकर मुंबईहून धाराशिवला जात असताना नवी मुंबईतील कळंबोली येथे त्यांची आणि त्यांचा वाहनचालक समद काझी यांची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केली. दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग करून त्यांच्यावर गोळीबार केला होता.

## मुस्लीम नेत्यांच्या सततच्या मागणीनंतर कर्नाटकात काँग्रेसने हिजाबबंदी रद्द केली

■ बंगळूरू

**कर्नाटक** सरकारने भाजपा सरकारच्या काळात २०२२ मध्ये जारी करण्यात आलेला हिजाबबंदीचा आदेश मागे घेतला आहे. या आदेशाद्वारे विद्यार्थिनींना वर्गात हिजाब घालण्यास बंदी आली होती. सत्तेत आल्यानंतर हा आदेश रद्द करण्याचे आश्वासन काँग्रेस सरकारने दिले होते, याची मुस्लीम नेत्यांनी वारंवार सरकारला आठवण करून दिली होती. त्यानंतर अखेर हा आदेश अधिकृतरित्या मागे घेण्यात आला.



राज्य सरकारने नवीन धोरण जाहीर करत आता विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयांमध्ये निर्धारित गणवेशासोबत मर्यादित धार्मिक किंवा समुदायाधारित प्रतीके वापरण्याची परवानगी दिली आहे. यामध्ये पगडी, जानवे, रुद्राक्ष आणि हिजाब, डोक्यावरचा स्कार्फ यांचा समावेश आहे.

हा नियम राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि खासगी शैक्षणिक संस्थांना लागू असेल. शालेय शिक्षण व साक्षरता मंत्री मधु बंगारप्पा यांनी सांगितले की, हा नवीन नियम येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होईल आणि कर्नाटकातील इयत्ता पहिली ते १२ वीपर्यंतच्या सर्व शैक्षणिक संस्थांना लागू असेल.

## कोकणातील आंबा-काजू उत्पादक अडचणीत सरकारशी बोलणी फिस्कटली! आज मोर्चा

**गणेश गावकर यांची विशेष मुलाखत**



**मुंबई - बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने यावर्षी कोकणातील आंबा आणि काजू बागायतदार आर्थिक संकटात सापडले आहेत. काल यावर सरकारशी झालेल्या बैठकीत तोडगा निघाला नाही. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उद्या मुंबईत गिरगाव चौपाटी ते मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर मोर्चा काढण्यात येणार आहे. यासंदर्भात सिंधुदुर्ग आंबा व काजू बागायतदार व्यापारी महासंघाचे मुख्य प्रवक्ते गणेश गावकर यांच्याशी 'नवाकाळ'च्या गायत्री पोरजे यांनी चर्चा केली.**

**प्रश्न - कोकणातील हापूस उत्पादन घटत आहे.**

**उत्तर** - गेल्या काही वर्षांपासून आंबा उत्पादक कर्जात अडकत आहे.



कोकणातील शेतकऱ्यांनी गेल्या पन्नास वर्षांत कधीच सरकारपुढे हात पसरले नव्हते. गेल्या वर्षी थ्रिप्स रोगाचा प्रादुर्भाव झाला. थ्रिप्स हा कीटक आहे जो मिरचीवर जास्त प्रमाणात असतो आणि त्याचा आता आंब्यावरही हल्ला वाढायला लागला आहे. थ्रिप्स गेल्या वर्षी महागडी फवारणी करूनही नियंत्रणात आला नाही. त्याच्यामुळे ३० ते ३५ टक्के नुकसान झाले. पिवळ्या रंगाची फळमाशी असते. ती आंब्याला दंश करते आणि आंबा सडवून टाकते. त्याच्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्याच्यावर कृषी विभागाने ट्रॅप बागेत लावण्याची सूचना दिली. परंतु त्याच्यावर कायमस्वरूपी तोडगा नाही. यावर्षी अतिप्रमाणात थंडी असल्यामुळे धुक्याचे प्रमाण वाढल्याने दवाचे प्रमाण वाढले. परिणामी मोहराला बुरशी झाली.

पान ७ वर

## ज्ञानेश्वर माऊलींचा मुक्काम यावर्षीही भवानी पेठेतच! रेसकोर्सची चर्चा थांबली

■ पुणे

**आषाढी** वारीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीच्या पुणे मुक्कामाबाबत सुरू असलेला संभ्रम अखेर दूर झाला. यावर्षीही पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील श्री विठ्ठल मंदिरातच होणार आहे. वाढती गर्दी आणि अपुऱ्या जागेमुळे मुक्काम रेसकोर्स मैदानावर हलवण्याची चर्चा रंगली होती. मात्र प्रशासनाने आवश्यक सुविधा आणि उपाययोजनांची लेखी हमी दिल्यानंतर संस्थान कमिटीने भवानी पेठेतील मुक्कामावर शिक्कामोर्तब केला.

याप्रकरणी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी लेखी हमी दिल्यानंतर हा संभ्रम दूर झाला. मंदिर परिसरातील अतिक्रमण हटवणे, अतिरिक्त जागा



उपलब्ध करणे, नवीन रस्ता तयार करणे आणि विद्युत खांब हलवण्याचे काम सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच पुणे

पान ७ वर

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

### पाहिजेत

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

प्रिंटींग प्रेसमध्ये कोमोरी मशीन LS 429 with UV कोटरसाठी प्रिंटर, फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC260506}

घर कामासाठी बाई पाहिजे आहे लोढा, अप्पर ठाणे, डोंबिवली (वेस्ट), संपर्क : **8169837819** {NC260525}

कटींग मशिन बाईंडर, ऑफसेट प्रिंटर आणि फिडरमेन बोईलर पाहिजेत. गोरेगांव ईस्ट. संपर्क: **9987049101** {NC260533}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर: **9819426634/ 9969529162** {NC260505}

पालघर जिल्ह्यातील विरार (पूर्व), पारोल फाटा येथील 'कृपा आर्ट पॅकेजिंगसाठी ५ प्लाय ऑपरेटर टीम आणि डिझायनर पाहिजे. **9820012278** {NC260482}

सिक्युरिटी गार्ड्स हवेत. मुलुंड पूर्व येथील एका मोठ्या सोसायटीला ६ चांगले सिक्युरिटी गार्ड्स हवेत. कामाच्या स्वरुपासाठी फोन करा नंतर भेटा. **9820025316** आधार कार्ड, बँक अकाऊंट आवश्यक. जवळ राहणाऱ्या प्राधान्य. {NC260534}

### पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

घरी काम करायला जोडपे पाहिजे. राहायची आणि खायची शाकाहारी सोय. बाई घरी काम करेल, पुरुष ऑफिसमध्ये काम करेल. पगार- 20,000/- फोन - **9820355492** {NC260497}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260448}

मिठाईच्या दुकानात अनुभवी Counter boy पाहिजे 12 तास घाटकोपर **9699927271** {NC260431}

कोपरखैरणे येथे 28x40 कोमोरी ४ कलर मशीनसाठी अनुभवी प्रिंटर व फिडरमन पाहिजे. संपर्क साई आर्टः **9820433552/ 9820542141** {NC260353}

डायरेक्ट भरती. सिक्युरीटीगार्डस पाहिजेत. बीकेसीकरीता. पगार 17,000/- + PF, ESIC+ जेवण+ टिप. 28 दिवस काम. **8796977016/ 9311037316** {NC260547}

भायखळा/ माझगांव विभागात कुरीयर डिलीव्हरीसाठी कमिशन/ पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260548}

वृद्धाश्रममध्ये केअरटेकर, हाउसकीपर, स्वयंपाकी पाहिजे राहण्याची खाण्याची सोय, महिना 12000-14000 पगार. कर्जत आणि पनवेल. **8291912166/67**{NC260545}

**भिवंडी/ मुंब्राच्या जवळ टेक्स्टाइल कंपनीला हेल्पर लेबर पाहिजेत! संपर्क: IMRAN: 8104662988 {NC260544}**

### Situation Vacant

Required male production supervisor for packaging co at Chakan Contact : **9833018829** {NC260535}

### Situation Vacant

Drivers Required - Khar West 12 Hours Duty, Innova Manual/ Automatic Cars, Immediate Joining. Call: **9821320934** {NC260546}

Rangeela Art Pvt Ltd. 252/258, Zaveri Bazar, Mumbai- 400002. We are looking for a Sales Girl for our imitation jewellery showroom. Requirements: *Good communication skills B Com passed Location: Zaveri Bazar, Mumbai Contact: **+919820442707** Interested candidates can call or WhatsApp for details. {NC260550}

Required outdoor duty/ peon at kandivali west (western line) age 20-35- call on **9868423657** {NC260551}

### शैक्षणिक

आपले शिक्षण अर्धवट राहिले आहे का? खर्डीकर क्लासेस... हमखास पास! शाळा सोडलेल्यांसाठी वा नापास विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुरु करण्याची हिच योग्य संधी! इयत्ता १० वी व १२ वी साठी प्रवेश सुरु. NIOS/SSC / HSC (Arts/ Commerce/ Science) संपर्क: **7506987030** {NC260549}

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

### गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# ज्येष्ठ समाजसेविका, आनंदग्रामच्या संस्थापिका डॉ. इंदुताई पटवर्धन

**ज्येष्ठ समाजसेविका, आनंदग्रामच्या संस्थापिका डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा जन्म १४ मे १९२६ रोजी जमखिंडीच्या राजघराण्यात झाला. इंदुताईंचे शिक्षण जमखिंडी व कोल्हापूर येथे झाले. राजकुमारी म्हणून जन्मलेल्या इंदूताईंनी १६ व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. मॉंटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या सेंट कोलंबो स्कूलमध्ये शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन ॲम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. दुसऱ्या महायुद्धातत्या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जखमी लष्करी जवानांचे शुश्रुषेसाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. वर्ष १९५३ मध्ये सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. पूना विमेन्स कौन्सिलचे कामही त्या करीत होत्या. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनच्या त्या संस्थापक-सदस्या होत्या.**



**डॉ.** इंदुताई यांनी लष्करातील जवान व आदिवासी समाजातील आजारी, जखमी रुग्णांची सेवा करत त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.

मुंबई इलाख्यात आपले जमखंडी संस्थान विलीन करणारे त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले संस्थानिक होते. पुणे येथील पूना कॉलेजला सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपये इतकी देणगी त्यांनी दिली होती व तेव्हापासून ते कॉलेज सर परशुरामभाऊ कॉलेज (एस. पी. कॉलेज) म्हणून ओळखले जाऊ लागले.

ऑक्सफॉम या संस्थेकडून १९६१ साली मिळालेल्या १७ हजार रुपयांच्या मदतीवर पुण्याजवळच्या डुडळगाव येथील एका ओसाड जागेवर 'आनंदग्राम' नावाने कुष्ठरोग्यांची वसाहत उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळ कुष्ठरोग सेवाकेंद्र सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत.१९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अंमलात आल्यावर त्यांनी ८० रुग्णांसह कुष्ठरोग्यांसाठी प्रत्यक्षात वर्ष १९६५ मध्ये काम सुरू केले. आळंदी जवळच्या सध्याच्या 'आनंदग्राम' येथे वर्ष १९७० मध्ये त्यांनी स्थलांतर केले.

उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी अशा व्यक्तींच्या सहाय्यामुळे 'आनंदग्राम'ला सध्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करत. सध्या आश्रमात राहणाऱ्यांकडून येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. रेशमासाठी इत्यादीची लागवड केली जाते. मुला-मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे आदर्शवत ठिकाण झाले आहे. खाद्यतेल सोडले तर सर्व काही इथेच बनते, धान्य पिकते, हातमागावर कपडे तयार होतात, दवाखाना, केशकर्तनालय इथे आहे. गोबर गॅस बनतो. इतके स्वयंपूर्ण गाव येथे त्यांनी उभे केले.

**संजीव वेलणकर पुणे**

इंदुताई पटवर्धन यांच्या कार्याची दाखल घेऊन शासनाने त्यांना 'दलितमित्र' हा पुरस्कार दिला. इंदुताई पटवर्धन यांचे ८ फेब्रुवारी १९९ रोजी निधन झाले.

# जयकुमार गोरेंना प्रणिती शिंदेंकडून नोटीस

■ सोलापूर

**सोलापूरचे** पालकमंत्री जयकुमार गोरे यांना काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. कथित बदनामीकारक वक्तव्य केल्याचा आरोप करत ७ दिवसांत बिनशर्त माफी मागण्याची मागणी नोटीसमध्ये करण्यात आली आहे.

७ मे रोजी सोलापूरमध्ये झालेल्या कार्यक्रमात जयकुमार गोरे यांनी प्रणिती शिंदे यांच्यावर टीका केली होती. सोलापूरमधील रस्त्यांचा विचार करत नाहीत, त्या दिल्लीतील राहुल गांधी यांच्या घरासमोरील रस्त्यांचा विचार

### सात दिवसांत माफीची मागणी

करतात असे विधान त्यांनी केले होते. या वक्तव्यावर आक्षेप घेत शिंदे यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला धक्का बसल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी खासदार शिंदे यांच्या वतीने ॲड. असीम सरोदे, ॲड. श्रिया आवले आणि ॲड. आर्या राजेभोसले यांनी नोटीस पाठवली आहे. मोहोळ-वळसंग रस्त्याच्या कामावरून सुरू असलेल्या श्रेयवादाच्या वादातून ही वादग्रस्त टिप्पणी करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. नोटीसमध्ये गोरे यांनी यापूर्वी केलेल्या काही विधानांचाही उल्लेख करण्यात आला आहे. तसेच, नोटीस मिळाल्यानंतर ७ दिवसांत माफी न मागितल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# वसईत भररस्त्यात तरुणीवर चाकूहल्ला

■ वसई

**मैत्रीच्या** वादातून वसईत २१ वर्षीय तरुणीवर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वसई पोलिसांनी हल्लेखोर तरुणाला अटक केली आहे.

ॲनस्विटा पाटील (२१) ही तरुणी बुधवारी सकाळी वसई किल्ल्याजवळील दत्तमंदिर रोड परिसरातून जात होती. त्यावेळी डॉमनिक बला (२३) या तरुणाने तिला रस्त्यात गाठले आणि तिच्यावर चाकूने सपासप वार केले. हल्ल्यात जखमी झालेल्या ॲनस्विटाला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ला केल्यानंतर डॉमनिक घटनास्थळावरून फरार झाला. वसई पोलिसांनी गुरुवारी हल्लेखोर डॉमनिक बला याला अटक केली आहे.

# सातार्‍यात खासगी बोट उलटली चालकाचा मृतदेह सापडला

■ सातारा

**महाबळेश्वर** तालुक्यातील तापोळा परिसरात कोयना (शिवसागर) जलाशयात खासगी बोट उलटल्याची घटना घडली असून, बेपत्ता झालेल्या बोट चालकाचा मृतदेह आज सापडला आहे. रुपेश धोंडीबा तांबे असे मृत चालकाचे नाव आहे. काल सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसादरम्यान ही घटना घडली. बामनोलीजवळील शिवसागर जलाशयात दोन पर्यटकांना फिरण्यासाठी घेऊन जात असताना बोट अचानक पलटी झाली. सुदैवाने दोन्ही पर्यटकांनी पोहत किनाऱ्यावर पोहोचत स्वतःचा जीव वाचवला. बोट चालक रुपेश तांबे हे पाण्यात बेपत्ता झाले होते.

# वैद्यकीय संस्थांना दिलासा विकास शुल्कात ५० टक्के सवलत

■ मुंबई

**राज्यातील** वैद्यकीय संस्थांना मोठा दिलासा देत विकास शुल्कात ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नगर विकास विभागाने घेतला आहे. यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत. यापूर्वी वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कात २५ टक्के सवलत दिली जात होती. मात्र आता ही सवलत वाढवून ५० टक्क्यांपर्यंत करण्यात येणार आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 14/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-01 : 7130**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0887 | 2026 | 2377 | 2631 | 4984 | 7170 | 8278 | 8479 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 8795 सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर | 9232 महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0292 | 3703 | 4128 | 4476 | 4717 | 4936 | 6627 | 6850 | 7716 | 8107 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1285 | 2438 | 2549 | 2934 | 3559 | 4392 | 5416 | 6486 | 6690 | 8138 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1262 | 3542 | 4030 | 4141 | 7506 | 7780 | 9021 | 9507 | 9793 | 9898 |

सहावे बक्षिस रु. 100/- — सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1550 | 2289 | 3288 | 3925 | 4722 | 5584 | 6596 | 7475 | 8164 | 9296 |
| | | 1620 | 2296 | 3306 | 3938 | 4761 | 5680 | 6607 | 7480 | 8192 | 9304 |
| 0027 | 0978 | 1653 | 2301 | 3326 | 3955 | 4872 | 5725 | 6611 | 7504 | 8260 | 9329 |
| 0055 | 1011 | 1669 | 2351 | 3339 | 3983 | 4995 | 5757 | 6646 | 7534 | 8296 | 9361 |
| 0063 | 1107 | 1728 | 2435 | 3346 | 3993 | 5053 | 5770 | 6661 | 7554 | 8298 | 9379 |
| 0075 | 1118 | 1787 | 2530 | 3369 | 4109 | 5055 | 5916 | 6676 | 7571 | 8320 | 9385 |
| 0130 | 1134 | 1792 | 2543 | 3373 | 4171 | 5071 | 5924 | 6721 | 7678 | 8406 | 9397 |
| 0162 | 1138 | 1830 | 2557 | 3376 | 4218 | 5082 | 5935 | 6818 | 7691 | 8548 | 9398 |
| 0209 | 1164 | 1836 | 2587 | 3380 | 4246 | 5111 | 5945 | 6824 | 7711 | 8550 | 9466 |
| 0257 | 1187 | 1841 | 2722 | 3405 | 4386 | 5185 | 5995 | 6851 | 7729 | 8633 | 9574 |
| 0457 | 1194 | 1856 | 2747 | 3413 | 4402 | 5211 | 6054 | 6928 | 7730 | 8678 | 9605 |
| 0471 | 1201 | 1951 | 2785 | 3470 | 4413 | 5221 | 6063 | 6966 | 7752 | 8698 | 9663 |
| 0502 | 1202 | 2002 | 2908 | 3582 | 4414 | 5250 | 6245 | 7040 | 7754 | 8794 | 9664 |
| 0561 | 1224 | 2023 | 2920 | 3583 | 4415 | 5305 | 6352 | 7047 | 7777 | 8817 | 9757 |
| 0686 | 1235 | 2069 | 2989 | 3613 | 4434 | 5341 | 6375 | 7053 | 7838 | 8871 | 9840 |
| 0726 | 1310 | 2120 | 3024 | 3622 | 4453 | 5355 | 6391 | 7102 | 7848 | 8888 | 9883 |
| 0738 | 1331 | 2122 | 3035 | 3635 | 4544 | 5359 | 6416 | 7130 | 7851 | 8937 | 9892 |
| 0763 | 1416 | 2125 | 3038 | 3702 | 4586 | 5455 | 6427 | 7187 | 8003 | 8973 | 9893 |
| 0905 | 1513 | 2202 | 3087 | 3725 | 4629 | 5459 | 6476 | 7221 | 8036 | 8991 | 9895 |
| 0910 | 1514 | 2206 | 3132 | 3769 | 4678 | 5509 | 6522 | 7257 | 8040 | 9004 | 9943 |
| 0919 | 1517 | 2221 | 3150 | 3785 | 4701 | 5555 | 6534 | 7267 | 8103 | 9016 | 9971 |
| 0938 | 1528 | 2234 | 3173 | 3833 | 4713 | 5562 | 6585 | 7391 | 8136 | 9209 | 9988 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी




## आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी — सोडत दर गुरुवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 20 सोडत दिनांक 14/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AP-04 : 1112**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी — **1112** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **7950** — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0042 | 0097 | 2329 | 2457 | 2679 | 2998 | 3376 | 5394 | 5425 | 8592 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1083 | 3690 | 3787 | 5537 | 6942 | 7396 | 7903 | 9414 | 9963 | 9976 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0162 | 0976 | 3184 | 4424 | 5049 | 5225 | 7478 | 7751 | 8082 | 9998 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0079 | 0566 | 2021 | 2065 | 3337 | 3707 | 4391 | 4991 | 5165 | 6981 |

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) — सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1157 | 1715 | 2582 | 3395 | 4140 | 4604 | 5394 | 6350 | 7069 | 7809 | 8739 | 9428 |
| | | 1159 | 1717 | 2596 | 3430 | 4154 | 4608 | 5430 | 6361 | 7073 | 7810 | 8758 | 9445 |
| | | 1161 | 1751 | 2620 | 3439 | 4176 | 4642 | 5456 | 6366 | 7078 | 7822 | 8799 | 9447 |
| | | 1178 | 1796 | 2637 | 3472 | 4209 | 4683 | 5502 | 6374 | 7082 | 7854 | 8848 | 9452 |
| | | 1195 | 1810 | 2639 | 3494 | 4216 | 4684 | 5514 | 6380 | 7088 | 7867 | 8853 | 9469 |
| 0006 | 0589 | 1215 | 1841 | 2727 | 3503 | 4239 | 4708 | 5524 | 6386 | 7126 | 7873 | 8869 | 9477 |
| 0007 | 0603 | 1216 | 1866 | 2762 | 3531 | 4244 | 4740 | 5541 | 6387 | 7144 | 7878 | 8880 | 9484 |
| 0019 | 0609 | 1225 | 1888 | 2768 | 3538 | 4252 | 4743 | 5547 | 6391 | 7176 | 7879 | 8884 | 9491 |
| 0041 | 0632 | 1230 | 1891 | 2806 | 3603 | 4254 | 4773 | 5548 | 6402 | 7182 | 7910 | 8887 | 9499 |
| 0042 | 0638 | 1241 | 1911 | 2822 | 3613 | 4276 | 4775 | 5565 | 6411 | 7250 | 7913 | 8890 | 9503 |
| 0047 | 0650 | 1252 | 1951 | 2823 | 3628 | 4278 | 4804 | 5571 | 6448 | 7256 | 7916 | 8891 | 9508 |
| 0059 | 0667 | 1267 | 1971 | 2832 | 3635 | 4288 | 4820 | 5645 | 6463 | 7267 | 7947 | 8899 | 9548 |
| 0064 | 0670 | 1269 | 2003 | 2854 | 3643 | 4304 | 4900 | 5650 | 6464 | 7277 | 7975 | 8916 | 9568 |
| 0066 | 0687 | 1278 | 2022 | 2902 | 3671 | 4305 | 4904 | 5656 | 6536 | 7283 | 7979 | 8950 | 9571 |
| 0072 | 0700 | 1321 | 2036 | 2942 | 3685 | 4342 | 4922 | 5671 | 6603 | 7308 | 8010 | 8982 | 9593 |
| 0086 | 0707 | 1336 | 2049 | 2947 | 3733 | 4345 | 4940 | 5738 | 6606 | 7350 | 8128 | 9052 | 9596 |
| 0098 | 0732 | 1343 | 2060 | 2997 | 3787 | 4354 | 4945 | 5745 | 6633 | 7361 | 8163 | 9073 | 9639 |
| 0110 | 0745 | 1361 | 2067 | 3043 | 3834 | 4381 | 4948 | 5867 | 6653 | 7362 | 8197 | 9083 | 9795 |
| 0111 | 0781 | 1382 | 2081 | 3051 | 3836 | 4394 | 5000 | 5873 | 6656 | 7377 | 8218 | 9093 | 9805 |
| 0113 | 0810 | 1413 | 2140 | 3060 | 3853 | 4395 | 5015 | 5886 | 6667 | 7407 | 8249 | 9119 | 9817 |
| 0150 | 0830 | 1426 | 2182 | 3062 | 3858 | 4402 | 5037 | 5899 | 6668 | 7449 | 8297 | 9135 | 9829 |
| 0161 | 0832 | 1446 | 2208 | 3075 | 3880 | 4406 | 5038 | 5913 | 6708 | 7458 | 8318 | 9139 | 9833 |
| 0165 | 0859 | 1449 | 2209 | 3083 | 3905 | 4422 | 5041 | 5926 | 6728 | 7523 | 8344 | 9149 | 9855 |
| 0202 | 0950 | 1455 | 2228 | 3087 | 3927 | 4429 | 5058 | 5927 | 6756 | 7530 | 8346 | 9150 | 9876 |
| 0203 | 1008 | 1471 | 2232 | 3103 | 3944 | 4431 | 5067 | 5950 | 6761 | 7544 | 8348 | 9159 | 9890 |
| 0213 | 1011 | 1479 | 2246 | 3109 | 3947 | 4432 | 5074 | 5960 | 6766 | 7545 | 8378 | 9162 | 9891 |
| 0237 | 1015 | 1481 | 2271 | 3134 | 3951 | 4437 | 5085 | 6001 | 6785 | 7557 | 8411 | 9194 | 9895 |
| 0240 | 1017 | 1491 | 2280 | 3181 | 3953 | 4438 | 5097 | 6125 | 6796 | 7570 | 8476 | 9195 | 9901 |
| 0267 | 1032 | 1495 | 2295 | 3201 | 3956 | 4442 | 5098 | 6126 | 6815 | 7579 | 8483 | 9203 | 9905 |
| 0269 | 1070 | 1502 | 2315 | 3230 | 3963 | 4443 | 5149 | 6139 | 6822 | 7657 | 8487 | 9209 | 9907 |
| 0316 | 1097 | 1518 | 2384 | 3231 | 4025 | 4444 | 5154 | 6154 | 6836 | 7670 | 8489 | 9259 | 9913 |
| 0339 | 1104 | 1519 | 2412 | 3272 | 4040 | 4445 | 5211 | 6160 | 6850 | 7673 | 8490 | 9279 | 9920 |
| 0343 | 1115 | 1534 | 2422 | 3277 | 4042 | 4446 | 5231 | 6161 | 6902 | 7674 | 8518 | 9280 | 9921 |
| 0400 | 1117 | 1556 | 2482 | 3296 | 4046 | 4501 | 5251 | 6162 | 6906 | 7676 | 8520 | 9290 | 9926 |
| 0426 | 1121 | 1565 | 2483 | 3302 | 4049 | 4545 | 5252 | 6167 | 6929 | 7703 | 8601 | 9298 | 9933 |
| 0440 | 1136 | 1575 | 2505 | 3308 | 4061 | 4550 | 5258 | 6207 | 6936 | 7717 | 8609 | 9340 | 9939 |
| 0470 | 1148 | 1576 | 2506 | 3321 | 4074 | 4574 | 5315 | 6212 | 6947 | 7719 | 8611 | 9349 | 9959 |
| 0478 | 1150 | 1617 | 2534 | 3365 | 4084 | 4576 | 5317 | 6231 | 6960 | 7723 | 8615 | 9361 | 9973 |
| 0480 | 1153 | 1692 | 2552 | 3390 | 4097 | 4599 | 5355 | 6267 | 6967 | 7729 | 8702 | 9387 | 9985 |
| 0558 | 1154 | 1703 | 2581 | 3393 | 4113 | 4601 | 5379 | 6348 | 7021 | 7744 | 8728 | 9396 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 14/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-02 : 1836**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2329 | 3724 महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर | 4081 लॉटरी भांडार, नागपूर | 4516 श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 6249 | 6697 | 7454 | 7517 | 7604 | 9248 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0458 | 3571 | 4043 | 4290 | 6267 | 8071 | 8470 | 8632 | 8713 | 9536 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1182 | 1334 | 1636 | 2636 | 2998 | 4353 | 5500 | 6350 | 7262 | 8463 |

पाचवे बक्षिस रु. 300/- — पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1653 | 3104 | 3735 | 4648 | 5652 | 6712 | 7283 | 8621 |
| | 1748 | 3166 | 3900 | 4650 | 5812 | 6762 | 7374 | 8729 |
| 0049 | 1819 | 3264 | 3943 | 4730 | 5854 | 6779 | 7440 | 8863 |
| 0145 | 2095 | 3318 | 3966 | 4823 | 5890 | 6846 | 7537 | 8884 |
| 0203 | 2207 | 3320 | 4033 | 4859 | 5919 | 6916 | 7617 | 8899 |
| 0300 | 2321 | 3423 | 4212 | 4900 | 5956 | 6946 | 7728 | 9068 |
| 0405 | 2327 | 3518 | 4231 | 5094 | 5976 | 7026 | 7734 | 9357 |
| 0578 | 2428 | 3523 | 4249 | 5211 | 6064 | 7053 | 7980 | 9453 |
| 0607 | 2522 | 3546 | 4288 | 5242 | 6067 | 7078 | 8027 | 9598 |
| 0749 | 2795 | 3604 | 4428 | 5470 | 6286 | 7115 | 8352 | 9704 |
| 1150 | 2883 | 3663 | 4496 | 5494 | 6414 | 7146 | 8370 | 9782 |
| 1360 | 2920 | 3715 | 4638 | 5533 | 6573 | 7196 | 8418 | 9869 |
| 1516 | 2927 | 3728 | 4642 | 5592 | 6693 | 7249 | 8584 | 9927 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 14/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-04 : 1166** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **4306** — कोमल एजन्सी - औरंगाबाद

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **4175** — रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1081 | 2193 | 2874 | 3432 | 3435 | 4948 | 5252 | 7226 | 7592 | 9661 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0208 | 1008 | 2145 | 2393 | 4166 | 4426 | 6888 | 7897 | 8421 | 9551 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0386 | 0965 | 2444 | 3075 | 5227 | 7507 | 8241 | 8738 | 9299 | 9635 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) — सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1912 | 2397 | 3656 | 4353 | 5358 | 6461 | 7471 | 8475 | 9217 |
| | | 1917 | 2471 | 3680 | 4364 | 5363 | 6506 | 7480 | 8477 | 9245 |
| | | 1918 | 2502 | 3691 | 4371 | 5512 | 6529 | 7515 | 8483 | 9260 |
| 0009 | 0995 | 1930 | 2513 | 3755 | 4384 | 5546 | 6604 | 7620 | 8524 | 9269 |
| 0067 | 1001 | 2037 | 2582 | 3830 | 4409 | 5582 | 6665 | 7689 | 8553 | 9293 |
| 0154 | 1004 | 2047 | 2669 | 3837 | 4454 | 5585 | 6675 | 7698 | 8632 | 9389 |
| 0172 | 1056 | 2050 | 2682 | 3920 | 4484 | 5595 | 6682 | 7710 | 8668 | 9555 |
| 0197 | 1081 | 2067 | 2696 | 3933 | 4540 | 5651 | 6691 | 7738 | 8684 | 9577 |
| 0250 | 1110 | 2103 | 2716 | 3939 | 4587 | 5822 | 6700 | 7750 | 8718 | 9587 |
| 0335 | 1131 | 2129 | 2887 | 4038 | 4608 | 5949 | 6718 | 7762 | 8768 | 9628 |
| 0380 | 1161 | 2179 | 2917 | 4045 | 4634 | 5954 | 6786 | 7770 | 8775 | 9840 |
| 0396 | 1175 | 2209 | 3094 | 4090 | 4644 | 6008 | 6821 | 7776 | 8832 | 9842 |
| 0430 | 1195 | 2220 | 3179 | 4143 | 4924 | 6043 | 6889 | 7778 | 8867 | 9911 |
| 0435 | 1251 | 2236 | 3312 | 4186 | 5005 | 6080 | 6976 | 7784 | 8884 | 9926 |
| 0469 | 1291 | 2252 | 3315 | 4231 | 5084 | 6150 | 7151 | 7932 | 8891 | 9929 |
| 0499 | 1317 | 2273 | 3328 | 4245 | 5118 | 6163 | 7153 | 8050 | 8919 | 9932 |
| 0606 | 1418 | 2279 | 3340 | 4247 | 5175 | 6271 | 7175 | 8065 | 9004 | 9938 |
| 0624 | 1626 | 2282 | 3380 | 4249 | 5183 | 6288 | 7331 | 8094 | 9060 | 9960 |
| 0738 | 1668 | 2305 | 3396 | 4309 | 5196 | 6289 | 7346 | 8145 | 9107 | 9965 |
| 0916 | 1816 | 2372 | 3481 | 4338 | 5252 | 6354 | 7373 | 8178 | 9109 | 9979 |
| 0924 | 1868 | 2376 | 3534 | 4352 | 5265 | 6414 | 7447 | 8441 | 9169 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी




# आजचे राशी भविष्य

शुक्रवार ता. १५ मे २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | नकारार्थी विचार दूर ठेवा. उत्साही व आशावादी दृष्टीकोन अनुकूलता वाढवेल. भावंडांशी मतभेद संभवतात. |
| वृषभ | आनंदी दिवस. इच्छा पूर्ण होतील. आनंदवार्ता मिळेल. बोलण्यातून गैरसमज संभवतो. सावध राहा. |
| मिथुन | फायदेशीर दिवस. चांगल्या संधी येतील. कुटुंबात शांतता आणि एकोपा राहील. |
| कर्क | कामाच्या ठिकाणी बदलांना सामोरे जावे लागेल. प्रवासही भरपूर होईल. दगदगीने तब्येतीवर ताण येईल. |
| सिंह | नशीबाची साथ नसल्याने आज महत्त्वाचे निर्णय घेणे टाळा. कष्ट आणि जबाबदाऱ्या वाढणार आहेत. वरिष्ठांशी मतभेद संभवतात. |
| कन्या | नियोजनबद्ध रीतीने कामे करणे महत्त्वाचे राहील. पैशाचे व्यवहार सावधपणे करा. कौटुंबिक तडजोड करावी लागेल. |
| तूळ | ताठरपणा टाळल्यास सफलता मिळवता येईल. कार्यक्षेत्रात अनेक नवीन संधी मिळतील. मित्र, सहकारी यांच्याबरोबर सुसंवाद राहील. |
| वृश्चिक | कौटुंबिक प्रगतीसाठी पावले उचलण्यास आजचा दिवस योग्य राहील. वडिलधाऱ्यांचा पाठिंबा मिळेल. कामात यश. |
| धनु | नातलग व मित्रमंडळींशी चांगले संबंध राखणे फायद्याचे ठरेल. कौटुंबिक वादविवाद त्रस्त करतील. अनपेक्षित धनलाभाची शक्यता. |
| मकर | महत्त्वाचे निर्णय घेण्यास मनस्थिती अनुकूल राहील. नियोजित कामे वेळेत पूर्ण होतील. वरिष्ठांची शाबासकी मिळेल. |
| कुंभ | कौटुंबिक प्रगतीबाबत विचार मनात घोळत राहतील. तणावामुळे कामाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता. तब्येतीकडे लक्ष द्या. |
| मीन | अतिविचार मानसिक गोंधळ वाढवणारा ठरेल. कौटुंबिक प्रश्नावरून अनावश्यक वादाची शक्यता. नेत्रविकारापासून जपा. |

## शुभ राशी ता. १५/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | १ |
| ४३ | ९३ | १० |
| ४८ | ९८ | १५ |
| १३० | १२६ | १३७ |
| ३४७ | ३७९ | ४७० |



# कोचिन-लक्षद्विप सीप्लेन सेवेची पहिली चाचणी यशस्वी

■ कोची

**लक्षद्विप** बेटांवर पोहोचण्याचा जलद मार्ग म्हणून सध्या सीप्लेन सेवेच्या व्यवहार्यता आणि सुरक्षिततेची चाचपणी करण्यासाठी काल घेण्यात आलेली पहिली चाचणी यशस्वी झाली. कोचीन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केलेले सीप्लेन दोन तासांत लक्षद्विपच्या परिसरात समुद्रात उतरले. त्यानंतर समुद्रातूनच उड्डाण घेत हे सीप्लेन सुखरुप कोचीन विमानतळावर परतले.

या महत्त्वाकांक्षी सीप्लेन सेवेची सिध्दता, व्यवहार्यता, सुरक्षितता तसेच सीप्लेन आणि विमानतळावरील नियंत्रण कक्ष यांच्यातील ताळमेळ आदिंची चाचणी घेण्यासाठी तीन दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यातील पहिला टप्पा कोचिन विमानतळ ते लक्षद्विप असा होता. निसर्ग सौंदर्याने नटलेला लक्षद्विप हा बेटांचा समूह ये-जा करण्यासाठी मुख्यतः जलमार्गे वाहतुकीवर अवलंबून आहे. त्यासाठी मोठी अवजड जहाजे वापरावी लागतात. हा प्रवास वेळखाऊ आहे. तसेच ही मोठी जहाजे सर्वच बेटांपर्यंत प्रवासी सेवा देऊ शकत नाहीत. त्यामुळे छोट्या सीप्लेनचा वापर करून लक्षद्विप अन्य शहरांशी जोडण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. कोची-अगत्ती-कालपेनी-कावरत्ती आणि कोची-कडमट-किलतान-अगत्ती या दोन मार्गांवर सीप्लेनच्या सुमारे १२ चाचण्या घेण्यात येणार आहेत. या १२ चाचण्यांचा अभ्यास करून सीप्लेन सेवेचा सर्वंकष आराखडा तयार करण्यात येणार आहे.

# अंधेरीत बेस्टच्या चार बसचा अपघात! एका वाहकाचा मृत्यू

**मुंबई-** अंधेरी पश्चिम परिसरात बेस्टच्या चार बस एकमेकांवर आदळल्याने अपघात झाला. या अपघातात ५२ वर्षीय वाहक शेखर बाबूराव रावते यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. हा अपघात अंबोली नाका परिसरात घडला.

अंधेरी स्थानक पश्चिम ते वर्सोवा या मार्गावर धावणाऱ्या बसमार्गावर अचानक झाड कोसळल्याने तीन बस रस्त्यावर अडकून पडल्या. त्यामुळे त्या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. या बस रांगेत उभ्या असताना मागून येणाऱ्या एका बसने जोरदार धडक दिली. धडकेच्या वेळी वाहक शेखर रावते हे बसच्या मागील बाजूने पुढे जात असताना दोन बसांच्या मध्ये आले.

# मुलाच्या आयुष्यात आई-वडील दोघे महत्त्वाचे! कोर्टाचा निर्वाळा

**आईच्या हट्टी स्वभावावर तीव्र नाराजी**

■ मुंबई

**मुलाच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या आयुष्यात आई आणि वडील दोघांचीही उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असते. दोन्ही पालकांचे स्थान तितकेच महत्त्वाचे आहे, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने मुलाच्या कोठडीच्या प्रकरणात याचिकाकर्त्या महिलेला झटका दिला.

६ वर्षांच्या मुलाच्या ताब्याशी संबंधित याचिकेवर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली. यावेळी न्यायालयाने आईच्या हट्टी स्वभावावर तीव्र नाराजी व्यक्त करीत स्पष्ट मत मांडले. मुलाच्या पालकांचे अर्थात या प्रकरणातील पती-पत्नीचे २०१६ मध्ये लग्न झाले होते. २०२० मध्ये त्यांना मुलगा झाला. मात्र कौटुंबिक वादानंतर मे २०२१ पासून दोघेही वेगळे राहत आहेत. मुलाचा ताबा सध्या आईकडे आहे. वडिलांनी मुलाला भेटण्याचा अधिकार मिळावा यासाठी कौटुंबिक न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर कौटुंबिक न्यायालयाने वडिलांच्या बाजूने निर्णय दिला होता. त्या निर्णयाला आव्हान देत आईने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तिची याचिका न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी फेटाळून लावली आणि वडिलांना मुलाला भेटण्याचा अधिकार कायम ठेवला. तसेच वडिलांना दरमहा दोन वीकेंडला मुलाची प्रत्यक्ष भेट घेण्याची आणि दररोज व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधण्याची परवानगी दिली. आई आपल्या पतीबद्दलच्या रागामुळे मुलाला वडिलांपासून दूर ठेवत आहे. आईची ही अतिमालकी हक्काची भावना मुलाच्या मानसिक आरोग्यासाठी आणि विकासासाठी हानिकारक ठरू शकते.

# मागणी करूनही म्हाडाला दुरुस्ती फंड नाही

■ मुंबई




**दक्षिण** मुंबईत म्हाडाच्या १२,५०० हजार सेस इमारती आहेत. यांच्या दुरुस्तीसाठी दोनशे कोटींचा फंड शासनाने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करूनही फंडाची तरतूद होत नसल्याने लागणाऱ्या फंडासाठी प्राधिकरणाकडून पैशांची उसनेवारी घ्यावी लागते, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातून देण्यात आली.

पुढे असे सांगण्यात आले की, सेस इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांच्या भाडेपट्टीतून वर्षाला ४० कोटी रुपयांचा सेस शासनाकडे जमा होतो. त्यात पालिका प्रशासन १० कोटी रुपये देते. म्हाडा १० कोटी आणि राज्य शासन ४० कोटी रुपये देते, असे मिळून १०० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होणे अपेक्षित असते. पण जेमतेम ७० कोटी जमा होतात. त्यामुळे सेस इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून म्हाडाला मिळणारा निधी अपुरा पडत आहे. त्यासाठी शासनाने दोनशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ शासनाकडे सातत्याने करते, पण मागणीला केराची टोपली दाखविली जाते.

# दौंडच्या पहिल्या महिला आमदार उषादेवी जगदाळे-पाटील यांचे निधन



■ दौंड

**दौंड** तालुक्यातील पहिल्या महिला आमदार उषादेवी कृष्णराव जगदाळे-पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने दौंड तालुक्यातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

उषादेवी जगदाळे-पाटील या दौंड विधानसभा मतदारसंघाच्या पहिल्या महिला आमदार होत्या. त्यांनी दोन वेळा आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. १९७२ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवत २१ हजार ४६५ मते मिळवून त्या प्रथमच विधानसभेत पोहोचल्या. त्यानंतर १९८५ मध्ये भारतीय काँग्रेस (समाजवादी) पक्षाकडून ३३ हजार ४०८ मते मिळवत त्यांनी दुसऱ्यांदा आमदारकी भूषवली.

दौंड परिसरातील त्यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाबद्दल त्यांना 'दौंड भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले होते. शहर व तालुक्यात त्या प्रेमाने माँसाहेब म्हणून ओळखल्या जात. राजकारणाबरोबरच त्यांना वाचन आणि अध्यात्माची आवड होती. त्यांचे पती कृष्णराव (बाळासाहेब) जगदाळे हे १९८० मध्ये दौंडचे आमदार होते. जगदाळे दाम्पत्याने अनेक वर्षे दौंडच्या राजकारणात प्रभावी नेतृत्व केले.

# आरपीआय नेते अनिल मोरेंची पिंपरी-चिंचवडमध्ये हत्या



■ पिंपरी-चिंचवड

**आरपीआय** (आठवले गट) कामगार आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल मोरे यांची पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात धारदार शस्त्राने हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. युवराज रेस्टॉरंट अँड बार येथे रात्री सुमारे नऊच्या सुमारास हा प्रकार घडला.

अज्ञात हल्लेखोरांनी मोरे यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर त्यांचा मृतदेह पिंपरीतील वायसीएम रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या घटनेनंतर आरपीआय कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, मोठी गर्दी रुग्णालय परिसरात जमली. मारेकऱ्यांना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा कार्यकर्त्यांनी घेतला आहे. अनिल मोरे हे आरपीआय (आठवले गट) मध्ये सक्रिय असून, ते कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष होते.

# लाखो मुंबईकरांच्या नळात दूषित पाणी! वर्षभरात २,६८७ तक्रारी

**मुंबईतील जलवाहिन्या जुन्या आणि जीर्ण**

■ मुंबई

**मुंबई** पालिकेकडून स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरवठा केला जात असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात लाखो मुंबईकरांच्या घरात दूषित आणि गढूळ पाणी पोहोचत असल्याची माहिती आहे. मार्च २०२५ ते मार्च २०२६ या एका वर्षात दूषित पाणीपुरवठ्याच्या तब्बल २,६८७ तक्रारी पालिकेच्या जल विभागाकडे दाखल झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक तक्रारी 'ई' विभागातून ३९०, तर 'टी' विभागातून ३६१ नोंदवल्या आहेत. पश्चिम उपनगरातील 'के/प' विभागातही २४० तक्रारी आल्या आहेत. पालिकेच्या माहितीनुसार, मुंबईतील जलवाहिन्या अनेक ठिकाणी जुन्या आणि जीर्ण झालेल्या आहेत.

शहरात सुरू असलेली सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे, विविध प्राधिकरणांकडून होणारी खोदकामे आणि विकास प्रकल्पांमुळे वारंवार जलवाहिन्यांना तडे जात आहेत. या गळतीमुळे अनेकदा मलनिस्सारण वाहिन्यांतील पाणी थेट जलवाहिन्यांमध्ये मिसळत असल्याने नागरिकांच्या घरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे प्रशासनाने मान्य केले. गोरेगाव पूर्व येथील गोकुळधाम आरएमएस-२२ वसाहतीतील नागरिक गेल्या २५ दिवसांपासून गढूळ पाण्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही जलअभियंता विभागाकडून दखल घेतली जात नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या मुद्यावर भाजपा नगरसेविका प्रीती साटम यांनी स्थायी समितीच्या बैठकीत थेट दूषित पाण्याच्या बाटल्या दाखवत प्रशासनाला जाब विचारला.

# मुळशीत अपघात! ९ जण जखमी

■ पुणे

**कोलाड** महामार्गावर मुळशी तालुक्यातील पौडजवळ मध्यरात्री भीषण अपघात झाला. विठ्ठलवाडी फाटा परिसरात कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पिकअप गाडीला धडक दिल्याने कारचा चुराडा झाला. या अपघातात कारमधील ८ ते ९ जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. माल घेऊन पिकअप गाडी रस्त्याच्या कडेला उभी होती. त्याचवेळी भरधाव वेगाने येणाऱ्या लाल रंगाच्या कारने पिकअपला धडक दिली. धडकेचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले.

# १२ वर्षांतच शाळेची दुरवस्था दुरुस्तीसाठी ५ कोटींचा खर्च

**प्रशासनाच्या कामावर प्रश्नचिन्ह**

■ मुंबई

**मुंबई** पालिकेच्या शिक्षण विभागाच्या कारभारावर मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी जोरदार टीका केली. मानखुर्द परिसरात २०१४ मध्ये बांधलेल्या महापालिकेच्या शाळेची अवघ्या १२ वर्षांत दुरुस्ती करण्याची वेळ आल्याने त्यांनी प्रशासनाच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या दुरुस्तीवर तब्बल ५ कोटी रुपये खर्च होणार असल्याने एवढ्या पैशांत नवीन शाळा उभी राहू शकते, असा टोलाही त्यांनी लगावला.

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाअंतर्गत सुमारे एक हजार शाळा असून, मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नडसह आठ भाषांमध्ये लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. यापैकी सुमारे ४०० शाळा शिक्षण विभागाच्या अखत्यारित आहेत. अनेक शाळांच्या इमारती ५० ते ६० वर्षांपूर्वीच्या असून, काही जुन्या शाळा पाडून नव्याने उभारण्यात आल्या आहेत. मात्र, काही वर्षांपूर्वी कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या नव्या शाळांचीही आता दुरुस्ती करावी लागत असल्याने शिक्षण विभागाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, शिक्षण समिती अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांनीही या मुद्यावरून प्रशासनाला धारेवर धरले.

# सवलत देऊनही विकासकांकडून शिवशाही घर भाड्याला टाळाटाळ

■ मुंबई

**शासन** अंगीकृत असलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या इमारतींतील घरांचे थकीत भाडे भरण्यासाठी विकासकांना सवलती देऊनही भाड्याची थकीत रक्कम भरणा करण्यास आडमुठी भूमिका घेतली आहे. त्यामुळे ही भाडे वसुलीसाठी कोणता मार्ग अवलंबवायचा, असा यक्ष प्रश्न शिवशाहीला पडला आहे.

अधिक माहिती देताना या कार्यालयातून असे सांगण्यात आले की, मुंबई एसआरए योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी धारकांच्या तात्पुरत्या राहण्याच्या सोयीसाठी सहा खासगी विकासकांनी शिवशाही प्रकल्पाची ६५० घरे भाडेतत्त्वावर घेतली आहेत. या विकासकांनी गेले अनेक वर्षे घरांचे भाडे अदा न केल्याने ही थकीत रक्कम ११६ कोटी रुपयांवर गेली आहे. या रकमेत सवलत देण्याची मागणी विकासकांनी केली होती. या अनुषंगाने गेल्या महिन्यात शिवशाहीच्या बोर्ड मिटिंगमध्ये मूळ भाड्याच्या रकमेवरील १६ टक्के व्याज ऐवजी आठ टक्के व्याज आणि वार्षिक १० टक्के भाडेवाढच्या रकमेत पाच टक्के, अशी सवलत जाहीर करण्यात आली आहे. यामुळे ११६ कोटी रुपयांऐवजी ९६ कोटी भरावे लागणार आहेत. तरीही विकासक आपली थकीत रक्कम भरण्यास पुढे येईनात. त्यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाची डोकेदुखी वाढली आहे.

# १५ वर्षे जुन्या इमारतींनाही स्ट्रक्चरल ऑडिट बंधनकारक

■ विरार



**शहरातील** १५ वर्षे जुन्या इमारतींनाही यापुढे संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणे वसई-विरार महापालिकेने बंधनकारक केले आहे. संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

पावसाळ्यात सतत इमारतीचा स्लॅब कोसळणे, इमारत कलंडणे असे प्रकार घडत असतात. मागील वर्षी गणेशोत्सव काळात विरार येथील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा काही भाग कोसळून १७ जणांचा मृत्यू झाला होता. असे प्रकार रोखण्यासाठी यापूर्वी जुन्या व जीर्ण अवस्थेत असलेल्या इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करणे बंधनकारक होते. मात्र आता शहरातील ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारती लेखापरीक्षण करणे, याशिवाय अंतर्गत दुरुस्ती करताना पालिकेच्या नोंदणीकृत संरचना लेखापरीक्षकाची परवानगी घेणे अनिवार्य असल्याचे पालिकेने सांगितले. पालिकेने प्रसिध्द केलेल्या नव्या नियमानुसार १५ ते ३० वर्षे जुन्या इमारतींनी दर ५ वर्षांतून एकदा तर ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधीत किमान दर ३ वर्षांतून एकदा लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे.

दुर्घटना टाळण्यासाठी सोसायट्यांनी स्वतःहून खबरदारी घेऊन इमारतीची सुरक्षा तपासणी करावे, असे आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी सांगितले.

# सिंधुरत्न समृद्ध योजना २.० ला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सिंधुरत्न समृद्ध योजना २.० ला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय झाला. नियोजन विभागांतर्गत राबविण्यात येणारी ही योजना कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून सर्वंकष विकास साधण्याच्या उद्देशाने पुढे सुरू ठेवण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील पर्यटन, मत्स्यव्यवसाय, कृषी, पायाभूत सुविधा, जलसंधारण आणि स्थानिक रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांना चालना देण्यावर भर दिला जाणार आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे योग्य नियोजन करून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि ग्रामीण भागातील विकासाला गती देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले.



# मीटरप्रमाणे भाडे न आकारल्यास तक्रार करा वाहतूक पोलिसांचे प्रवाशांना आवाहन

■ वसई

**वसई**-विरार शहरात रिक्षाचालकांनी मीटरनुसार भाडे आकारणी करणे सक्तीचे करण्यात आले असले तरी त्याची अंमलबजावणी रिक्षाचालक करत नाहीत. अशा रिक्षाचालकांवर कारवाई करण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. कुणी मीटरनुसार भाडे आकारले नाही तर पोलिसांच्या नियंत्रण कक्षाकडे तक्रार करावी, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

वसई-विरार शहरातील रिक्षाचालक मीटर असूनही मीटरनुसार भाडे आकारत नव्हते. प्रवाशांकडून मनमानी पद्धतीने भाडे आकारणी केली जात आहे. या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर १५ नोव्हेंबर २०२५ पासून रिक्षांना मीटरनुसार भाडे आकारणी करणे सक्तीचे करण्यात आले होते. परंतु अद्यापही बहुतांश रिक्षाचालक मनमानी पध्दतीने भाडे आकारत आहेत.

आता वाहतूक पोलिसांनी या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई करण्याचे ठरवले आहे.

जर कोणत्याही रिक्षाचालकाने मीटरनुसार भाडे घेतले नाही तर पोलीस आयुक्तालयाच्या ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन वसई वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत लांघी यांनी केले आहे. प्रादेशिक परिवहन विभागानेदेखील अशा तक्रारी करण्यासाठी लवकरच हेल्पलाईन क्रमांक जाहीर करणार असल्याचे सांगितले आहे.

# कुसुमाग्रज प्रतिष्ठानला दरवर्षी १० लाखांचे अनुदान

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळ बैठकीत आज कुसुमाग्रज प्रतिष्ठान या संस्थेला दरवर्षी १० लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय झाला. यानुसार मराठी भाषा विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी देत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या साहित्य संस्थांना अनुदाने या योजनेतून सन २०२६-२७ पासून हा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान ही मराठी साहित्य, संस्कृती आणि सामाजिक उपक्रमांसाठी कार्यरत असलेली महत्त्वाची संस्था मानली जाते. ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या साहित्य वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी संस्था विविध उपक्रम राबवत असते.

# मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित

**सुमारे ८,७६७ पदांना मंजुरी**

■ मुंबई

**महाराष्ट्र** शासनाने मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयानुसार राज्यात एकूण सुमारे ८ हजार ७६७ पदांना मान्यता देण्यात आली आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या या निर्णयानुसार, मृद व जलसंधारण विभागासाठी ६ हजार ४८१ पदे आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरिता २ पदे, अशी एकूण ६ हजार ४८३ पदांची मूळ संरचना निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय विभागाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी सुमारे २ हजार २८४ नवीन पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे विभागाची क्षेत्रीय यंत्रणा अधिक सक्षम आणि परिणामकारक होण्याची अपेक्षा आहे. राज्यातील जलसंधारण, मृदसंवर्धन, जलसाठा वाढवणे, जलस्त्रोतांचे व्यवस्थापन आणि शेतीस पूरक योजना प्रभावीपणे राबविण्यास यामुळे मदत होणार आहे. नवीन पदनिर्मितीमुळे तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर विभागाची क्षमता वाढणार असून, विविध प्रकल्पांची अंमलबजावणी वेळेत आणि अधिक प्रभावीपणे होण्याची शक्यता आहे. तसेच, यामुळे रोजगाराच्या संधींमध्येही वाढ होणार आहे.

# नाशिक रिंग रोड प्रकल्प जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळ बैठकीत आज नाशिक परिक्रमा मार्ग अर्थात रिंग रोड प्रकल्पासाठी आवश्यक जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी देत प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. नाशिक शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करणे, शहराबाहेरील वाहतूक सुरळीत करणे आणि भविष्यातील शहरी विस्तार लक्षात घेऊन परिक्रमा मार्ग प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन आवश्यक असून, मुद्रांक शुल्कातील सवलतीमुळे जमीन खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. रिंग रोड प्रकल्पामुळे शहरातील अंतर्गत वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार असून, औद्योगिक, व्यापारी आणि निवासी भागांमधील संपर्कही अधिक सक्षम होणार आहे.

# काळू धरण विरोध संघर्ष शिगेला! अजित नवले यांचाही विरोध

■ मुरबाड



**मुरबाड** तालुक्यातील प्रस्तावित काळू नदीवरील धरणाच्या माध्यमातून मुंबई आणि इतर महानगरे यांच्या पिण्याच्या पाण्याकरिता काळू धरण प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रशासकीय पातळीवर जोरदार हालचाली सुरू

असताना महाराष्ट्र दिनी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा मुख्यालयात बोलताना केलेल्या काळू धरणाच्या भूसंपादन व पुनर्वसन या बाबींकरिता एमएमआरडीए यांच्या माध्यमातून ४५० कोटी रुपये कोकण पाटबंधारे विभागाकडे वर्ग केल्याचे जाहीर केले. या जाहीर वक्तव्याचे काळू नदी धरणग्रस्त सामाजिक संस्था व शाई धरण संघर्ष समितीच्या वतीने प्रशांत सरखोत यांच्या नेतृत्वाखाली संयुक्तरित्या निषेध करण्यात आला होता.

त्या पार्श्वभूमीवर काळू नदी धरणग्रस्त सामाजिक संस्था यांच्या शिष्टमंडळाने ज्येष्ठ शेतकरी नेते तथा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांची अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी काळू धरण विरोधी संघर्ष समिती यांनी केलेल्या संघर्षाचे कौतुक करून पुढील काळात काळू नदी क्षेत्रातील शेतकरी व कष्टकरी यांच्या पाठीशी आपण राहणार असल्याचे आश्वासन नवले यांनी देत प्रस्तावित धरणाच्या संभाव्य बाधित क्षेत्रातील रहिवासी व शेतकरी यांच्यावर सरकार जर दडपशाही करून अन्याय करीत असेल तर किसान सभा स्वतः या लढ्यात स्थानिकांच्या सोबत उतरेल, असे डॉ.नवले यांनी सांगून विरोधात सामिल असल्याचे जाहीर केले. गेली अनेक वर्षांपासून निधीविना दुरुस्तीसाठी रखडलेल्या मौजे तळेगाव येथील शिरसोणवाडी धरण ते मौजे चासोळे येथे प्रस्तावित असलेल्या काळू धरणाचा बांध असा कृती समितीने आयोजित केलेल्या आक्रोश मोर्चाला उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याचे डॉ. नवले यांनी कबूल केले असल्याचे काळू धरण विरोधी संघर्ष समितीचे सह-अध्यक्ष पोपटराव देशमुख यांनी सांगितले.

# राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या गटावर दावा नाही

**मुंबई -** राज्य सरकारने भरती प्रक्रियेसंदर्भात राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबत नवे नियम स्पष्ट केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सामान्य प्रशासन विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. या निर्णयानुसार, वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव तसेच परीक्षेला बसण्याच्या संधीमध्ये सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता संबंधित राखीव प्रवर्गातूनच केली जाणार आहे. सरकारच्या नव्या धोरणानुसार, विविध प्रकारच्या सवलतींचा लाभ घेतलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही. यापूर्वी काही प्रकरणांमध्ये राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सवलतींचा लाभ घेतल्यानंतरही गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागांवर नियुक्ती मिळवली होती. मात्र, आता अशा नियुक्तींवर स्पष्ट निर्बंध घालण्यात आले आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आमदार, खासदारांच्या भत्त्यातही काटकसर हवी

सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशवासीयांना केलेल्या आवाहनावर जोरदार चर्चा सुरू आहे. प्रामुख्याने भविष्यकाळातील आर्थिक संकटांची चाहूल लागल्याने त्यांनी या काटकसरीच्या उपाययोजना सांगितलेल्या दिसतात. देशाच्या हितासाठी, देशाच्या प्रमुखांनी केलेले हे आवाहन महत्त्वपूर्ण ठरते. परंतु संपूर्ण देशवासीयांना देशासाठी म्हणून काही जबाबदारीने काम करण्याची सूचना त्यातून आपोआप मिळून जाते. सर्वसामान्य नागरिक हा आपल्या देशाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काही गोष्टी स्वीकारण्याच्या मनस्थितीतदेखील असतो. परंतु याचा आदर्श जर सर्वसामान्यांसमोर घालून द्यायचा असेल तर अशा देशहिताच्या गोष्टींची अंमलबजावणी त्या त्या नेतृत्वाने स्वतःपासून करायची असते. काटकसरीच्या उपाययोजना सांगितल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये कपात केली. ते दौऱ्यावर असताना त्यांच्यासोबत येणाऱ्या सुरक्षारक्षकांच्या संख्येत कपात केली आणि आता परदेश दौरेदेखील कमी करणार आहेत. अशाच प्रकारचे अनुकरण आता वेगवेगळ्या राज्यांमध्ये मंत्री, मुख्यमंत्री करू लागले आहेत. आमदारांनी देखील अशा प्रकारचे निर्णय घेतलेले आहेत. परदेशी दौरे कमी करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. या सगळ्या गोष्टी स्वागतार्ह असतानाच अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा असतो की, सर्वसामान्य माणसाला तो विशेषत्वाने जाणवतो तो म्हणजे देशाच्या तिजोरीवरचा अतिरिक्त भार जर कमी झाला पाहिजे. याची सुरुवात प्रामुख्याने आमदार, खासदार किंवा मंत्र्यांना मिळणारे अवाजवी भत्ते आणि निवृत्ती वेतन, पगार यामध्येदेखील कपातीपासून झाली पाहिजे. आज आमदार, खासदारांना काही लाख रुपये दर महिन्याला पगाराच्या स्वरूपात मिळतात. म्हणजे त्याची आकडेवारी जर बघायची झाली तर साधारणपणे प्रत्येक खासदाराला महिन्याकाठी दोन ते सव्वादोन लाख रुपये वेगवेगळे भत्ते आणि पगार यांच्या स्वरूपामध्ये मिळत असतात तर प्रत्येक आमदाराला साधारणपणे पगार म्हणून एक लाख ४२ हजार रुपये मिळतात. शिवाय त्यांचे इतर भत्ते यांचा एकत्रित विचार केला तर ही रक्कम दोन लाख ४१ हजारांपर्यंत जाते. ज्यामध्ये टेलिफोन भत्ता, स्टेशनरी भत्ता, संगणक भत्ता आणि ज्यावेळेला अधिवेशन असेल त्या अधिवेशन काळात प्रत्येक दिवशी मिळणारा भत्ता अतिरिक्त स्वरूपाचा असतो. रेल्वे, विमान प्रवासासाठी त्यांना भरपूर सुविधा मिळतात. वैद्यकीय सुविधांचेही बरेच लाभ त्यांना घेता येतात. एवढेच नव्हे तर निवृत्त झालेल्या आमदार, खासदारांवर होणारा खर्च देखील हा प्रचंड स्वरूपाचा आहे. एकदा जरी आमदार किंवा खासदार म्हणून निवडून आले तरीसुद्धा त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन हे जवळजवळ ५० हजाराच्या घरात जाते. सरकारने अलीकडेच कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवृत्ती वेतन धोरण जाहीर केले होते. यामध्ये कर्मचाऱ्यांचा शेवटचा पगार जो असेल त्याच्या निम्मे निवृत्तीवेतन देण्याची त्यांनी घोषणा केली होती.

**पिढ्यान्‌पिढ्या पेन्शन आणि भत्ते**

हेच तत्व आमदार, खासदारांनाही लागू केले जाऊ शकते. परंतु एकदा खासदार, आमदार झाले तर त्यांना हयातभर निवृत्तीवेतन देण्याचा प्रकार हा अनावश्यक ठरतो. म्हणजेच देशाच्या तिजोरीवर काही कोटींचा भार हा आमदार, खासदारांच्या पगारातून आणि निवृत्ती वेतनातून पडत असतो. जर काटकसरीचीच उपाययोजना करायची असेल तर इतक्या मोठ्या प्रमाणावर आमदार, खासदारांचे पगाराचे किंवा त्यांच्या भत्त्यांची आवश्यकता आहे का याचादेखील गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. जर देशाच्या सामान्य जनतेला काटकसरीच्या योजनांचे महत्त्व पटवून द्यायचे असेल तर त्याकरता प्रथम आपल्या खिशाला कात्री लावण्याची तत्परता लोकप्रतिनिधींनी दाखवली पाहिजे. परंतु आज परिस्थिती अशी असते की, आमदार, खासदार किंवा नगरसेवक सुद्धा हा इतर पद्धतीने बरीच मोठी कमाई करत असतो. ही कमाई जरी अधिकृत नसली तरी सुद्धा त्याला मिळणारे मानधन हे त्याचा सन्मान करणारेच असते. मात्र एकदा नगरसेवक झाल्यानंतर हयातभर निवृत्तीवेतन देण्याचा प्रकार अन्यायकारक ठरतो. म्हणूनच पंतप्रधानांच्या काटकसरीच्या योजनांमध्ये या गोष्टीचा देखील तितक्याच गांभीर्याने अंतर्भाव होण्याची आवश्यकता आहे . सगळ्या आमदार, खासदार, नगरसेवकांनी त्यांना मिळणाऱ्या पगार किंवा मानधन आणि भत्त्यांमध्ये किमान पाच ते दहा टक्के कपात करण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. जर सर्वांनी एकत्रित मिळून हा पुढाकार घेतला तर सर्वसामान्य माणसाला देखील आपण निवडून दिलेले लोकप्रतिनिधी हे खरोखरच देशहिताची जाणीव ठेवून किंवा देशाच्या तिजोरीचा विचार करून प्रत्यक्ष कृती करतात याबद्दलचा विश्वास निर्माण होऊ शकेल.

**...तरच विश्वास बसेल**

विशेषतः निवृत्तीवेतनाच्या संदर्भामध्ये गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. लोकप्रतिनिधी हे केवळ राजकारणावर जगणारे असू नयेत, राजकारणातल्या उत्पन्नावरच त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या जर जगत असतील तर तो देखील फार मोठा सर्वसामान्य माणसावर लादलेला खर्च ठरतो. राजकारण करायचे, सगळ्या सरकारी सोयी-सुविधा उपभोगायच्या आणि पुन्हा आपण फार मोठी समाजसेवा करत आहोत, असा टेंभा मिरवून घ्यायचा. हा प्रकार लोकप्रतिनिधींच्या ढोंगीपणाचाच नमुना ठरतो. खरे तर राजकारण करत असताना आपापला व्यवसाय सांभाळून आपल्या उत्पन्नाचे साधन त्यांनी शाबूत ठेवले पाहिजे. केवळ समाजहित आणि देशहितासाठी आवश्यक तेवढे मानधन घेण्याची सभ्यताही दाखवली पाहिजे. दुर्दैवाने राजकारणात ही सभ्यता उरलेली नाही. उलट सरकारी योजनांचा, सरकारी सुविधांचा प्रचंड लाभ पदरात काढून घेण्याची त्यांची मनोवृत्ती असते आणि ही मानसिकता बदलल्याशिवाय सर्वसामान्य माणसाच्या मनावर पंतप्रधानांच्या आवाहनांचा परिणाम होणार नाही हे लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. राजकारणांच्या उक्ती आणि कृतीमध्ये नेहमीच मोठी तफावत असते. म्हणूनच त्यांच्या बोलण्या आणि वागण्यामध्ये समानता असली पाहिजे. आजच्या परिस्थितीत आमदार, खासदारांनी पगारकपातीचा आदर्श घालून देण्याची गरज आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

पुस्तकातून शिकायला गेलं की झोप येते, पण आयुष्याने शिकवलं की झोप उडून जाते. कारण अनुभवाचा धडा कोणत्याही पुस्तकाच्या पानावर लिहिलेला नसतो.

## पंचांग

**शुक्रवार, १५ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



*** वैशाख कृष्ण त्रयोदशी/चतुर्दशी**
*** नक्षत्र : अश्विनी**

**रवी उदय- ०६-०६**
**रवी अस्त- १९-०५**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मेष**

**अमावास्या उत्तररात्री ५.११ नंतर, अगस्ती लोप, सूर्य वृषभ सकाळी ६.२१, पुण्यकाळ सकाळी ६.२१ ते दुपारी १२.४५**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### कैरीचे चित्रान्न



★ **साहित्य :** तांदूळ ३ वाट्या, एक कैरी साल काढून किसून, २ चमचे शेंगदाणे, २ चमचे काजू, २ चमचे डाळ, १ चमचा उडदाची डाळ, ४ लाल मिरच्या (कोरड्या), ५ दाणे मिरीचे, पाव चमचा मेथी, पाव चमचा मोहरी, अर्धा चमचा जिरे, पाव वाटी सुके खोबरे, एक हिरवी मिरची, एक लाल मिरची, कढीपत्ता, चवीनुसार मीठ, एक छोटा चमचा साखर, पाव वाटी कोथिंबीर, पाव वाटी खोवलेले खोबरे, तीन ते चार चमचे तेल.

★ **कृती :** प्रथम तांदूळ स्वच्छ धुवून कुकरमध्ये शिजवून घ्या. भात किंचित मोकळा करायचा. तयार भात परातीला पाण्याचा हात लावून त्यात पसरून ठेवायचा. तो गार झाल्यावर चवीनुसार मीठ व साखर (छोटा चमचा)घालायचे.

मिरी, मोहरी, मेथी, जिरे, मिरची कोरडेच पॅनमध्ये भाजून घ्यायचे. सुके खोबरं पण परतून घ्यायचे. या सर्व गोष्टी मिक्सरवर बारीक वाटून घ्यायच्या. पातेलीत तेल गरम झाले की, प्रथम शेंगदाणे तळून घ्यायचे, तळलेले दाणे भातावर पसरवायचे, नंतर काजू तळून घ्यायचे. याच गरम तेलात फोडणी करायची. मोहरी, जिरे, हिंग घालून झाल्यावर उडदाची डाळ खमंग परतायची, नंतर कढीपत्ता, मिरची घालून परतायचे, आपण वाटलेला मसाला आता फोडणीत घालायचा, किसलेली कैरी घाला. सर्व मिश्रण दोन मिनिटे परतून घ्यायचे. गॅस बंद केल्यावर शेवटी डाळ घालायचे आणि नंतर हळद घालायची. आता तयार खमंग फोडणीत गार भात घालायचा. दोन मिनिटे झाकण ठेवून वाफ आणायची. शेवटी कोथिंबीर व खोबरे घालून चित्रान्न वाढायचे. चित्रान्न गार छान लागते. शिळ्या भाताचे सुध्दा चित्रान्न करतात.




# सलग चौथ्या विजयासाठी चेन्नई संघ सज्ज

## आज लखनौ संघाला जोरदार टक्कर देणार

**लखनौच्या भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियममध्ये उद्या रात्री होणाऱ्या आयपीएलच्या ५९ व्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सला चेन्नई सुपर किंग्स जोरदार टक्कर देणार आहे. हा सामना जिंकून चेन्नई प्लेऑफच्या शर्यतीत टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासोबत सलग चौथा विजय मिळवण्यासाठी चेन्नईचे खेळाडू मैदानावर उतरणार आहे. लखनौ संघ याआधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. हा संघ आपली प्रतिष्ठा परत मिळवण्याचा प्रयत्न करेल आणि चेन्नईच्या संधींना सुरुंग लावण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही.**




■ लखनौ

**आयपीएलच्या** या हंगामात चेन्नईने आतापर्यंत ११ सामने खेळले आहेत. त्यातील ६ सामन्यांत विजय मिळवला आहे, तर ५ सामन्यांत पराभव पत्करावा लागल्यामुळे चेन्नई १२ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. तर लखनौ संघानेही ११ सामने खेळले आहेत. त्यातील ३ सामन्यांत विजय मिळवला, तर ८ सामन्यांत पराभव झाला. त्यामुळे लखनौ ६ गुणांसह गुणतालिकेत तळाच्या स्थानावर आहे. या दोन्ही संघात शेवटचा सामना १० मे २०२६ रोजी झाला होता. त्यात चेन्नई ५ गडी आणि ४ चेंडू शिल्लक राखून विजय मिळवला होता. प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी चेन्नईच्या संघाला आता उर्वरित सामने जिंकावे लागणार आहे. गेल्या काही सामन्यांपासून चेन्नईच्या कामगिरीत चांगली सुधारणा झाली आहे. चेन्नईचा सलामीवीर संजू सॅमसन, उर्विल पटेल, कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि काही नवीन खेळाडूंमुळे संघाने जोरदार पुनरागमन केलेले आहे. उर्विलच्या निर्भीड खेळामुळे पॉवरप्लेमध्ये चेन्नईच्या कामगिरीत सुधारणा झाली. शिवम दुबे, कार्तिक शर्मा आणि देवाल्ड ब्रेविस यांनाही मधल्या षटकांमध्ये चांगली कामगिरी करावी लागेल. धोनी लखनौमध्ये दाखल झाला आहे, पण तो मैदानात उतरेल की नाही हा एक मोठा प्रश्न आहे.

स्टार वेगवान गोलंदाज जेमी ओव्हरटन दुखापतीमुळे इंग्लंडला परतला. त्यामुळे चेन्नईला मोठा धक्का बसला. त्यांच्या अनुपस्थितीने चेन्नईचे गोलंदाजी आक्रमण कमकुवत झाले. त्याने १० सामन्यांमध्ये १४ बळी घेतले होते. तो या हंगामात चेन्नईच्या गोलंदाजीचा कणा होता. अकील हुसेन, मुकेश चौधरी आणि अंशुल कंबोज यांनीही चांगली कामगिरी केली आहे. अफगाण डावखुरा फिरकी गोलंदाज नूर अहमद प्रभावी ठरला आहे. कर्णधार पंतच्या सततच्या खराब फॉर्मचे परिणाम लखनौला भोगावे लागले. त्यांचे गोलंदाज प्रतिस्पर्ध्यांवर दबाव टाकण्यात अपयशी ठरले आहेत.

## थायलंड बॅडमिंटन ओपन स्पर्धा पी.व्ही. सिंधू उपांत्यपूर्व फेरीत

■ बँकॉक

**भारतीय** स्टार पी.व्ही.सिंधूने डेन्मार्कच्या अमाली शुल्झचा २१-१३, २१-१५ असा पराभव करून थायलंड बॅडमिटन ओपनच्या महिला एकेरी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. हा सामना केवळ २८ मिनिटे चालला आणि सिंधूने सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व गाजवले. आता उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना जपानच्या विद्यमान विश्वविजेत्या अकाने यामागुचीशी होईल.

भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिरागने मलेशियाच्या ब्रायन जेरेमी गुंटिंग आणि मोहम्मद हैकल यांचा २१-१२, २१-१९ असा पराभव केला. आता उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना जपानच्या ताकुमी नोमुरा आणि युइची शिमोगामी या जोडीशी होईल. भारतीय खेळाडू उन्नती खराबचा प्रवास पहिल्याच फेरीत संपुष्टात आला. एका चुरशीच्या सामन्यात चीनच्या जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या चेन यू फेईने तिला २१-१९, १३-२१, १८-२१ असे पराभूत केले. हा सामना एक तास आणि १० मिनिटे चालला.

## सुपर चेस क्लासिकमधून भारताच्या गुकेशची माघार

■ नवी दिल्ली

**सुपर** चेस क्लासिकच्या पहिल्या फेरीत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद हा फ्रान्सच्या अलीरेझा फिरौजा विरुद्ध खेळतील. विश्वविजेता डी. गुकेशने क्लासिकल प्रकारातून माघार घेतली असून, या स्पर्धेत प्रज्ञानंद हा एकमेव भारतीय खेळाडू शिल्लक राहिला. १० खेळाडूंच्या या स्पर्धेच्या ९ फेऱ्यांपैकी ५ फेऱ्यांमध्ये तो पांढऱ्या सोंगट्यांनी खेळेल. या स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम ३५०००० डॉलर आहे, तर १२५००० डॉलर बोनस म्हणून दिले जातील. पहिले बक्षीस १ लाख डॉलर आहे. एप्रिलमध्ये झालेल्या कॅन्डिडेट्स स्पर्धेतील साधारण कामगिरीनंतर प्रज्ञानंदला आपल्या खेळात सुधारणा करावी लागेल. लाईव्ह रेटिंगनुसार तो जागतिक क्रमवारीत १६ व्या स्थानावर घसरला आहे.

## मुंबई आणि लातूरची विजयी घोडदौड सुरू

■ बदलापूर




**छत्रपती** शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबईसह कोल्हापूर, लातूरच्या संघांनी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी दिली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात पुणे संघाने नाशिक विरूध्द चिवट झुंज देत विजय खेचून आणले. पुण्याच्या मुलींच्या दोन्ही संघाने चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवित दिवस गाजवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा बदलापूर जिमखाना मैदानावर रंगली. कडक उन्हामुळे संध्याकाळी विद्युतप्रकाश झोतात

### अटीतटीच्या लढतीत पुण्याची नाशिकवर मात

रंगलेल्या या स्पर्धेचा पहिला दिवस पुणे संघाने गाजविला. पुणे संघाच्या मुलींच्या दोन्ही संघाने विजयश्री प्राप्त केली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटातील अटीतटीच्या लढतीत पुणे संघाने नाशिकचा २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करून गटात अव्वल स्थानावर झेप घेतली आहे. साखळी पद्धतीने १८ व २१ वर्षांच्या मुला-मुलींच्या स्पर्धेत दोन गटांत स्पर्धा रंगली आहे.

## सलामवीर वैभव सूर्यवंशी प्रथमच 'भारत अ' संघात

**कोलंबो** - श्रीलंकेत होणाऱ्या एकदिवसीय तिरंगी मालिकेसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघाचा सलामीवीर वैभव सूर्यवंशीला पहिल्यांदाच 'भारत अ' संघात स्थान मिळाले, या मालिकेत अफगाणिस्तानचाही समावेश असणार आहे. गेल्या वर्षी राजस्थान रॉयल्सचा वैभव आयपीएलमध्ये चर्चेत आला होता व या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या विश्वचषक स्पर्धेत तो भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. यानंतर अव्वल दर्जाच्या क्रिकेटमध्ये या १५ वर्षीय खेळाडूची झपाट्याने होणारी प्रगती सुरूच आहे. १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात त्याने ८० चेंडूंमध्ये १७५ धावा ठोकून भारताला विजेतेपद मिळवून दिले होते.

## बॅडमिंटन स्पर्धेत काव्या, हिमांशुला दुहेरी मुकुट

■ मुंबई

**मनोरा** बॅडमिंटन अकादमीच्या विद्यमाने नुकत्याच मलबार हिल क्लब येथे आयोजित करण्यात आलेल्या ११ ते १७ वर्षांखालील मुला-मुलींच्या बॅडमिंटन स्पर्धेत काव्या सर्वांना कुमार, हिमांशू भाटकरने शानदार खेळ करत दुहेरी मुकुटाचा मान मिळवला. काव्याने मुलींच्या ११ आणि १३ वर्षांखालील आणि हिमांशूने मुलांच्या १५, १७ वर्षांखालील गटात विजेतेपदाचा मान मिळवला. मनोरा बॅडमिंटन अकादमीची ही ११९ वी स्पर्धा होती.

राज्यभरातून १०० पेक्षा जास्त खेळाडूंचा प्रतिसाद स्पर्धेला मिळाला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मलबार हिल क्लबचे बॅडमिंटन खेळाचे चेअरमन




सोहम दारुवाला यांच्या हस्ते संपन्न झाला. मनोरा बॅडमिंटन अकादमीचे संचालक मनोहर गोडसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अथक मेहनत घेतली.

## परिवर्तन चषक क्रिकेट स्पर्धा अनुज, अक्षदची शतकी खेळी

■ मुंबइ

**मुंबईचा** १४ वर्षांखालील मुलांचा संघ निवडण्यासाठी खेळविण्यात येणाऱ्या परिवर्तन चषक निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या दिवसाच्या खेळावर अनुज चौधरी (१०९), अक्षद जोशी (१००) यांची शतके आणि आरव यादवने मिळविलेले ६ बळी यांनी आपली मोहर उमटवली.

ओव्हल मैदान येथील वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मैदानावर सुरू झालेल्या लढतीत सुनील गावस्कर संघाने नाणेफेक जिंकून दिलीप वेंगसरकर संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले आणि अनुज चौधरींच्या शतकी खेळीनंतरही त्यांचा डाव १९१ धावांवर रोखण्यात यश मिळविले. अनुजने १२१ चेंडूंत २० चौकारांसह १०९ आणि अथर्व पाचकुडे याने २४ धावा केल्या. गावस्कर संघाचा डावखुरा फिरकी गोलंदाज नीरज पनवरने ५४ धावांत ४ बळी मिळविले, मध्यमगती गोलंदाज रितेश नंदेश्वर (४०/२) आणि श्रेयांस सिंग (२७/२) यांनी प्रत्येकी २ बळी मिळविले. पहिल्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा गावस्कर संघाने ३५ षटकांच्या खेळात ३ बाद ९५ धावा केल्या होत्या.

## भारतीय ज्युनियर हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदी फ्रेडरिक सोयेझ

■ नवी दिल्ली

**फ्रेंच** फील्ड हॉकी प्रशिक्षक आणि माजी खेळाडू फ्रेडरिक सोयेझ यांची आज भारतीय ज्युनियर पुरुष हॉकी संघाच्या नव्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. ते दोन वेळचे ऑलिम्पिक पदक विजेते पी. आर. श्रीजेश यांची जागा घेतील. गेल्या वर्षी चेन्नई आणि मदुराई येथे झालेल्या एफआयएच ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने कांस्यपदके जिंकल्यानंतर श्रीजेश यांचा करार संपला होता. हॉकी इंडियाने त्यांचा करार नूतनीकरण केला नाही. युरोपियन हॉकीमधील सर्वोत्कृष्ट प्रशिक्षकांपैकी एक असलेल्या सोयेझ यांना सर्वोच्च स्तरावर प्रशिक्षणाचा १५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी १९९५ ते २०१० या काळात फ्रान्ससाठी १९६ आंतरराष्ट्रीय सामने खेळून १९५ गोल केले. त्यानंतर त्यांनी फ्रान्स आणि स्पेन संघाला प्रशिक्षण दिले.

## दिल्ली-महाराष्ट्रसह देशातील १६ राज्ये ३ केंद्रशासित प्रदेशांत एसआयआर जाहीर

■ नवी दिल्ली

**निवडणूक** आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (एसआयआर) तिसऱ्या टप्प्याची घोषणा केली आहे. या मोहिमेअंतर्गत बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) घराघरात जाऊन मतदारांशी थेट संपर्क साधणार आहेत.निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाख वगळता जवळपास संपूर्ण देश या मोहिमेच्या कक्षेत येणार आहे.

आयोगाने सांगितले की, जनगणनेअंतर्गत सुरू असलेल्या घरांची यादी तयार करण्याच्या कामासोबत समन्वय साधून एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या टप्प्यात ३.९४ लाखांहून अधिक बूथ लेव्हल अधिकारी ३६.७३ कोटी मतदारांच्या घरी जाऊन संपर्क साधणार आहेत. ओडिशा, मिझोरम, सिक्कीम, मणिपूर, दमण-दीव, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, चंदीगड, तेलंगणा, पंजाब, कर्नाटक, मेघालय, महाराष्ट्र, झारखंड, दिल्ली, नागालँड आणि त्रिपुरा या राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये SIR प्रक्रिया राबवली जाणार आहे.

## हरियाणा पालिका निवडणुकांमध्ये भाजपाचा दणदणीत विजय


■ चंदिगड

**हरियाणाच्या** नगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवला. पंचकुला, अंबाला आणि सोनिपतमध्ये भाजपाचा भगवा फडकला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर जनतेचा दृढ विश्वास आहे, हेच या निकालांमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले,अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी या विजयानंतर दिली. उलकानाचा अपवाद वगळता सर्व नगरपालिकांवर भाजपाची सरशी झाली. उलकाना नगरपालिकेत २३ वर्षांचा एक विद्यार्थी अपक्ष उमेदवार अध्यक्षपदी निवडून आला. काँग्रेसचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला. इंडियन नॅशनल लोकदल (आयएनएलडी) आणि आम आदमी पार्टीने (आप) काही पालिकांमध्ये उमेदवार उभे केले होते. मात्र आपला भोपळाही फोडता आला नाही.

देश विदेश

## चीन लष्करातील भ्रष्टाचार उघड दोन संरक्षणमंत्र्यांना मृत्युदंड



■ बीजिंग

**भ्रष्टाचाराविरोधातील** कठोर कारवाई चीनने मोठा निर्णय घेत दोन माजी संरक्षणमंत्र्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. ली शांगफू आणि वेई फेंघे यांना लाचखोरी, पदाचा गैरवापर आणि लष्करी करारांमधील अनियमिततेप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे.

चीनच्या लष्करी न्यायालयाने दिलेल्या या निर्णयानुसार, दोघांना सुरुवातीला दोन वर्षे कारावास भोगावा लागणार आहे. या कालावधीत त्यांनी कोणताही नवीन गुन्हा न केल्यास त्यांची शिक्षा जन्मठेपेत परिवर्तित होण्याची तरतूद आहे.दोन्ही नेत्यांना २०२४ मध्ये सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षातून बडतर्फ करण्यात आले होते. लष्करातील रॉकेट फोर्समध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर या कारवाईला वेग आला. क्षेपणास्त्र प्रणालीत गंभीर त्रुटी आढळल्याने या प्रकरणाने आंतरराष्ट्रीय स्तरावरही खळबळ उडवली होती.

तज्ज्ञांच्या मते, ही कारवाई शी जिनपिंग यांच्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेचा भाग असून लष्करातील शिस्त आणि पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न आहे. लष्करी खरेदी, संरक्षण करार आणि उपकरण पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात लाचलुचपत झाल्याचे तपासात आले आहे. सेंट्रल मिलिटरी कमिशन (सीएमसी) या सर्वोच्च लष्करी संस्थेच्या चौकशी संस्थांनी या प्रकरणाचा तपास केला. चीनच्या अण्वस्त्र आणि क्षेपणास्त्र नियंत्रणासाठी महत्त्वाची मानली जाणारी रॉकेट फोर्सही या चौकशीच्या केंद्रस्थानी होती. गेल्या वर्षभरात चीनने लष्करी आणि एरोस्पेस क्षेत्रातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केली असून, या निर्णयामुळे चीनच्या लष्करात मोठी साफसफाई सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

## मणिपूरमध्ये ३ चर्च नेत्यांची गोळ्या घालून हत्या

■ इम्फाळ



**मणिपूरच्या** कांगपोकपी जिल्ह्यात थाडौ बॅप्टिस्ट असोसिएशनच्या ३ चर्च नेत्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली, तर ५ जण जखमी झाले. हल्लेखोरांनी दबा धरून हा हल्ला केला. या हल्ल्यानंतर कांगपोकपी आणि आसपासच्या कुकी-जो बहुल भागांमध्ये तणाव पसरला.

ते चुराचंदपूर जिल्ह्यातून एका टीबीए परिषदेला उपस्थित राहून कांगपोकपीला गाडीने परत येत होते. त्यांच्यावर हल्लेखोरांनी दबा धरून हा हल्ला केला.या घटनेमुळे संतप्त झालेल्या लोकांनी दगड आणि लाकडी अडथळे लावून राष्ट्रीय महामार्ग बंद केला. हा महामार्ग मणिपूरला नागालँड आणि देशाच्या इतर भागांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. मृतकांमध्ये मणिपूर बॅप्टिस्ट कन्व्हेन्शनचे माजी सरचिटणीस रेव्ह. व्ही. सितल्होउ यांचा समावेश आहे. इतर दोन मृतांची ओळख रेव्ह. व्ही. कैगौलुन आणि पास्टर पाओगोलेन अशी झाली आहे. मणिपूरमध्ये चर्च नेते आध्यात्मिक मार्गदर्शनासोबतच सामाजिक आणि राजकीय बाबींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. ते हिंसाग्रस्त भागांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी चर्चा, मदत कार्ये आणि आदिवासी ख्रिश्चन एकतेचे रक्षण करण्यात सक्रिय आहेत.

## दक्षिण कोरियात चॅटजीपीटीला विचारून महिलेकडून २ पुरुषांची हत्या

■ सेओल

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**दक्षिण** कोरियामध्ये एका महिलेवर चॅटजीपीटीच्या मदतीने दोन पुरुषांची हत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. आरोपी महिलेच्या मोबाईलमधील चॅटजीपीटीवरील संभाषण हेच या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचे पुरावे ठरत आहेत.

दक्षिण कोरियाच्या पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किम सो-यंग नावाच्या महिलेने तीन पुरुषांना दारूमध्ये 'बेंझोडायझेपिन' या औषधाचे मिश्रण करून दिले होते. या प्रकारात दोन पुरुषांचा मृत्यू झाला, तर एक जण बचावला. आरोपी महिला पुरुषांसोबत डेटवर जात असे आणि नंतर त्यांना विषारी मिश्रण असलेले पेय देत असे.तपासादरम्यान पोलिसांना तिच्या मोबाईलमधून काही धक्कादायक चॅट्स मिळाले.

## पाकमध्ये ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यांगना शीमा केरमानींना पोलिसांकडून अटक

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानातील** ज्येष्ठ शास्त्रीय नृत्यांगना आणि महिला हक्क कार्यकर्त्या शीमा केरमानी यांना कराचीमध्ये काही काळ पोलिसांनी ताब्यात घेतल्याने वाद निर्माण झाला. या घटनेनंतर पाकिस्तानात कलात्मक स्वातंत्र्य, महिला हक्क आणि पोलिसांच्या वागणुकीवरून चर्चा सुरू झाली.

कराची प्रेस क्लबबाहेर 'औरत मार्च'च्या कार्यक्रमासाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळवण्यासाठी शीमा केरमानी आणि इतर कार्यकर्ते जमले होते. त्यावेळी सिंध पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये महिला पोलीस कर्मचारी केरमानी यांना जबरदस्तीने वाहनाकडे घेऊन जात असल्याचे दिसते. या व्हिडिओनंतर पाकिस्तानासह जगभरातून संताप व्यक्त करण्यात आला.

## मिरा-भाईंदरमध्ये अग्निशमन दलातील जवानांना जनगणनेची जबाबदारी

■ भाईंदर

**मीरा** - भाईंदर महापालिका प्रशासनाने अग्निशमन दलातील जवानांवर जनगणनेची जबाबदारी सोपवल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आग विझवण्याच्या कामात गुंतलेल्या जवानांना जनगणनेच्या प्रशिक्षणासाठी पाठवल्याने अग्निशमन विभागात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिरा-भाईंदर शहरात मार्चपासून वाढलेल्या तापमानामुळे आगीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अनेकदा एका दिवसात दोन ते तीन आगी लागण्याच्या घटना घडत आहेत. काही दुर्घटनांमध्ये तिघांचा होरपळून मृत्यू झाला आहे. शॉर्टसर्किट, प्लास्टिक शेड आणि भंगार गोदामांमधील आगींमुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागातील जवानांनाही जनगणनेच्या कामासाठी नियुक्त केल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जनगणनेसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात पहिल्याच दिवशी सुमारे ५० जवान उपस्थित राहिल्याने अनेक अग्निशमन केंद्रे ओस पडली.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का आनंद परांजपेंचा सर्व पदांचा राजीनामा

■ ठाणे



**राष्ट्रवादी** पक्षाचे नेते आनंद परांजपे यांनी आज त्यांच्या पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. आनंद परांजपे हे गेले अनेक दिवस नाराज होते असे म्हटले जात आहे. त्यांनी सरचिटणीस, प्रवक्ता आणि ठाणे-पालघर समन्वय पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. विधान परिषदेचे तिकीट न मिळाल्याने ते नाराज होते. आनंद परांजपे हे शिंदे गटात जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती, ज्यामुळे या चर्चांना अधिक जोर मिळाला आहे.

## जय पवार यांच्याकडे राष्ट्रवादीचे खजिनदार पवार कुटुंबाची पकड! पटेल, तटकरेंना डावलले

■ पुणे

अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खजिनदार पदावर जय पवार यांची नियुक्ती केली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे ही नवीन नियुक्ती सुपूर्द केली आहे. नवीन रचनेनुसार पक्षाच्या बँक आणि आर्थिक व्यवहारांचे पूर्ण अधिकार आता पवार कुटुंबाकडे आले आहेत. यापुढे कोणत्याही आर्थिक व्यवहारासाठी राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, महासचिव पार्थ पवार आणि खजिनदार जय पवार या तिघांचीच स्वाक्षरी बंधनकारक असणार आहे. तटकरे आणि पटेल यांना डावलण्यात आले आहे.

आर्थिक व्यवहारांचे पूर्ण नियंत्रण, पक्षांतर्गत जबाबदारी आता अजित पवार कुटुंबाकडे आली आहे. अधिकृत दस्तऐवजानुसार, शिवाजीराव गर्जे यांच्याकडे लेखापरीक्षणाचे काम राहील, तर तिजोरी आणि खजिनदारपदाचा मुख्य कार्यभार जय पवार सांभाळतील. याशिवाय जय पवार यांच्याकडे पक्षाच्या अनुशासन समितीच्या अध्यक्षपदाची आणि राष्ट्रीय सचिवपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. यापूर्वी पक्षाचे आर्थिक व्यवहार दिवंगत नेते अजित पवार आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्या स्वाक्षरीने होत असत. मात्र, नवीन बदलांमुळे प्रफुल्ल पटेल यांना या प्रक्रियेतून बाजूला सारण्यात आले आहे.

## समृद्धीवर होडीतून प्रवास केल्यासारखे वाटते! सचिन अहिर यांची टीका

■ शिर्डी (अहिल्यानगर)

उबाठाचे माजी मंत्री तथा उपनेते सचिन अहिर यांनी समृद्धी महामार्गासह विविध महामार्गांच्या कामांच्या दर्जाबाबत गंभीर टीका केली आहे. ते म्हणाले की, शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी मुंबईहून समृद्धी महामार्गावरून प्रवास करताना होडीतून प्रवास करत असल्यासारखं वाटत होते.

सचिन अहिर म्हणाले की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे रस्ते विकासाचे काम चांगलं सुरू आहे. असे असले तरी घाईघाईत प्रकल्पांचे उद्घाटन केल्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. माजी मंत्री सचिन अहिर यांनी मंगळवारी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले . त्यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या खडतरलेल्या कामावरही नाराजी व्यक्त केली. मुंबई-गोवा महामार्गाचे काम अजून किती काळ चालणार आहे?

## भारतात महागाईचा स्फोट! महागाई दर ८.३० टक्क्यांवर

■ नवी दिल्ली

**इंधन,** वीज आणि कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या तीव्र वाढीमुळे एप्रिल महिन्यातील घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर झपाट्याने वाढून ८.३० टक्क्यांवर पोहोचला. मार्चमध्ये हा दर ३.८८ टक्के होता. वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने आज ही आकडेवारी जाहीर केली.

इंधन आणि वीज गटातील महागाई दर एप्रिलमध्ये २४.७१ टक्क्यांवर गेला असून मार्चमध्ये तो केवळ १.०५ टक्के होता. कच्चे पेट्रोलियम क्षेत्रातील महागाई ८८.०६ टक्क्यांवर पोहोचली असून मागील महिन्यात ती ५१.५ टक्के होती. पश्चिम आशियातील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीवरील प्रभावी नाकेबंदीमुळे भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीवर परिणाम झाला आहे. त्याचा थेट परिणाम घाऊक महागाईवर झाल्याचे मानले जात आहे. अन्नधान्य गटातील महागाई दर एप्रिलमध्ये १.९८ टक्के राहिला, जो मार्चमध्ये १.९० टक्के होता. बिगर-अन्न वस्तूंमधील महागाई १२.१८ टक्क्यांवर गेली असून मार्चमध्ये ती ११.५ टक्के होती.



मंत्रालयाने म्हटले आहे की, खनिज तेल, कच्चे पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, मूलभूत धातू, अन्य उत्पादन क्षेत्रे आणि बिगर-अन्न वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे एप्रिलमधील महागाई दरात वाढ झाली.

## ७० कोटींच्या खंडणी प्रकरणात चाकणकरांची ईडीकडून चौकशी

■ मुंबई

**नाशिकमधील** भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात माजी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची सक्तवसुली संचालनालय (ईडी) कार्यालयात आज ८ तास चौकशी करण्यात आली. ७० कोटी रुपयांच्या कथित खंडणी रॅकेटशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या अनुषंगाने ही चौकशी सुरू आहे.

विशेष तपास पथकाने काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये चाकणकर यांची साडेपाच तास सविस्तर चौकशी केली होती. त्यानंतर १४ मे २०२६ रोजी त्यांना ईडीकडून समन्स बजावण्यात आले होते. दरम्यान या प्रकरणात एसआयटीने दोन लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये न्यायालयात सुमारे १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. पीडितांची बदनामी रोखण्यासाठी सायबर पोलिसांच्या मदतीने १३,१७५ आक्षेपार्ह व्हिडिओ लिंक आणि ४५१ सोशल मीडिया खाती कायमस्वरूपी हटवण्यात आली आहेत.

## २०१६ ला नीटची गरजच नव्हती! राज ठाकरेंचा केंद्रावर हल्लाबोल

■ मुंबई



**नीट** परीक्षेतील गोंधळानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. २२ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या संबंधित मंत्र्याचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. राज ठाकरे यांनी आपल्या पत्रात नीट परीक्षेच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत, मुळात २०१६ मध्ये नीट लागू करण्याची गरज नव्हती असा स्पष्ट आरोप केला.

राज ठाकरे म्हणाले की, एकच परीक्षा देशभर लादण्याच्या धोरणामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून, केंद्र सरकारच्या निर्णयामुळे लाखो कुटुंबांवर अन्याय होत आहे.नीट पेपरफुटी प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, परीक्षा व्यवस्थेत मोठे गैरप्रकार होत असून, कोचिंग क्लासेसचे जाळे आणि आर्थिक शक्ती यांचा प्रभाव वाढत चालला आहे. ज्याच्याकडे व्यवस्था वाकवण्याची ताकद आहे, त्यालाच फायदा होतो.सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. पण २२ लाख मुलांचं आणि त्यांच्या कुटुंबीयांचं आयुष्य टांगणीला लागलं त्याचं काय ?मुळात २०१६ ला नीट लादण्याची गरजच नव्हती. पण सगळं एकछत्री अंमलाखाली आणण्याची या सरकारची खुमखुमी इतकी तीव्र आहे की मग काही लाख लोकांच्या आयुष्याशी खेळखंडोबा झाला तर काय फरक पडतो ? नीटबद्दल मी २०१६ पासून आक्षेप नोंदवत होतो.

पुढे राज ठाकरे म्हणाले की , सध्याचे तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री विजय पण नीट रद्द करा म्हणून आग्रह धरत आहेत. कारण दक्षिणेतील ५ राज्य आणि महाराष्ट्र मिळून जवळपास ३५० च्या वर मेडिकल कॉलेजेस आहेत. उत्तरेतली मोठ्या राज्यांमध्ये फक्त १८० मेडिकल कॉलेजेस आहेत. त्यामुळे

## पेट्रोल-डिझेल दरवाढीने धार्मिक पर्यटन अडचणीत! टूर पॅकेज वाढले




■ भाईंदर

**अमेरिका,** इस्त्रायल आणि इराण युद्धाच्या तणावाचा फटका आता स्थानिक धार्मिक पर्यटन व्यवसायालाही बसला आहे. सिलिंडर टंचाई, वाढते डिझेल-पेट्रोल दर आणि महागाईमुळे भाविकांनी सहलींकडे पाठ फिरवली. यामुळे धार्मिक पर्यटन उद्योग अडचणीत सापडला आहे.

मीरा - भाईंदर शहरातून दरवर्षी उत्तर आणि दक्षिण भारतातील विविध धार्मिक स्थळांसाठी मोठ्या प्रमाणावर सहली आयोजित केल्या जातात. चारधाम, अयोध्या, प्रयागराज, काशी, जगन्नाथ पुरी, तिरुपती, रामेश्वरम, मदुराई, कन्याकुमारी आणि नेपाळपर्यंत जाणाऱ्या सहलींना पूर्वी प्रतिसाद मिळत होता. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून नवीन बुकिंग जवळपास बंद झाल्याचे पर्यटन व्यावसायिक सांगत आहेत. यापूर्वी निश्चित झालेल्या अनेक सहलीदेखील रद्द कराव्या लागल्याने पर्यटन उद्योग आर्थिक संकटात सापडला आहे.

स्थानिक टूर ऑपरेटरच्या माहितीनुसार, मिरा-भाईंदरमधील दोन प्रमुख टूर कंपन्या दरवर्षी ५० ते १०० पर्यटकांच्या १० ते १२ गट सहलींचे आयोजन करत होत्या. मात्र, वाढत्या खर्चामुळे हा व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे. व्यावसायिकांच्या मते, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळाबाजार वाढल्याने पूर्वी २२०० ते २५०० रुपयांना मिळणारा सिलिंडर आता तब्बल ६००० रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

## दिल्लीमध्ये आठवड्यातून २ दिवस 'वर्क फ्रॉम होम'



■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि काटकसरीचे आवाहन केल्यानंतर दिल्ली सरकारने सर्व सरकारी कार्यालयांमध्ये आता आठवड्यातून दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम' लागू करण्याची घोषणा केली. याशिवाय प्रवास आणि इंधनाचा वापर कमी करण्यासाठी ५० टक्के शासकीय बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णयही घेतला.

सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, गर्दीच्या वेळी होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी दिल्ली पालिकेच्या कार्यालयीन वेळांमध्येही बदल केले आहेत. तसेच नागरिकांमध्ये इंधन बचत आणि जबाबदार वापराबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

इंधन खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी शासकीय वाहनांच्या वापरावरही निर्बंध घातले आहेत. अधिकाऱ्यांसाठी असलेली पेट्रोल मर्यादा २० टक्क्यांनी कमी करून, पुढील सहा महिन्यांत कोणतीही नवीन शासकीय वाहने खरेदी केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

## मुळा-मुठा नदीच्या विकासासाठी जमिनी विनामुल्य हस्तांतरित होणार

■ पुणे

**पुणे** महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला मोठी चालना मिळणार असून, मुळा-मुठा नदी विकासासाठी तीन शासकीय जमिनी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

या अंतर्गत संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल दरम्यानच्या नदी पात्रातील काही भाग, तसेच बॉटेनिकल गार्डन परिसर आणि महिला, बाल व सुधारगृहाची जमीन पुणे महापालिकेकडे वर्ग करण्यात येणार आहे. महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या स्तरावरून या हस्तांतरणाला मान्यता देण्यात आली आहे.

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या माध्यमातून मुळा-मुठा नदी परिसराचे सुशोभीकरण, प्रदुषण नियंत्रण, नदीकाठ संवर्धन आणि नागरिकांसाठी खुली हरित क्षेत्रे निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पात पायाभूत सुविधा, पादचारी मार्ग, सायकल ट्रॅक आणि सार्वजनिक वापरासाठी जागांचा विकास करण्यात येणार आहे.सरकारी जमिनींच्या हस्तांतरणामुळे प्रकल्पासाठी आवश्यक जागेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असून, कामांना गती मिळेल.

## विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा टप्प्याटप्प्याने संप! जूनपासून कामबंद

■ छत्रपती संभाजीनगर


**राज्यातील** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासह अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे.

८ जूनपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा राज्य कार्याध्यक्ष डॉ. कैलास पाथ्रीकर यांनी दिला आहे. कुलगुरू डॉ. विजय पाथ्रीकर आणि कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांची समितीच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. डॉ. कैलास पाथ्रीकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत राज्य कार्यकारिणी सदस्य अनिल खामगावकर, सचिव मनोज शेटे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित असून, वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासनेच मिळाल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

# सहा कोटी मानधन?

अभिनेता अर्जुन रामपाल याने अनिल शर्मा यांच्या आगामी 'अर्जुन नागा' या चित्रपटामध्ये खलनायकाची भूमिका साकारण्यासाठी ६ कोटी रुपये मानधन घेतल्याची चर्चा आहे. 'धुरंधर' या चित्रपटाच्या प्रचंड यशानंतर अर्जुनने आपल्या मानधनात मोठी वाढ केली असून या मेगा-ब्लॉकबस्टरमधील त्याच्या 'मेजर इक्बाल' या भूमिकेचे प्रचंड कौतुक झाले होते.

या चित्रपटात अनिल शर्मा यांचा मुलगा उत्कर्ष शर्मा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. निर्माते या भूमिकेसाठी एका ताकदीच्या अभिनेत्याच्या शोधात होते आणि अखेर त्यांनी अर्जुन रामपालची निवड केली. अनिल शर्मा आणि त्यांच्या टीमने अर्जुनसाठी अतिशय प्रभावी आणि जनसामान्यांना आवडेल अशी व्यक्तिरेखा तयार केली आहे. अर्जुनला देखील ही व्यक्तिरेखा प्रचंड आवडली असून त्याने या चित्रपटासाठी होकार दिला आहे. हा चित्रपट ॲक्शन, इमोशन, कॉमेडी आणि ड्रामा या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असा मनोरंजक चित्रपट असणार आहे.



# नेहा आणि अंगदची 'डबल डेट'



'डबल डेट' नावाच्या एका नव्या 'नॉन-फिक्शन' मालिकेद्वारे नेहा धुपिया आणि अंगद बेदी ही जोडी प्रथमच पडद्यावर एकत्र आली आहे. ही मालिका नेहा धुपियाच्या युट्यूब चॅनेलवर प्रदर्शित होत असून यात मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध जोड्या, भावंडे आणि मित्र सहभागी होताना दिसतील. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कलाकारांच्या आयुष्यातील वैयक्तिक आणि मजेशीर पैलू प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. केवळ मुलाखतींपुरते मर्यादित न राहता यामध्ये सेलिब्रिटी जोडपे विविध खेळांमध्ये आणि आव्हानांमध्ये सहभागी होतील. आगामी मोसमात हुमा कुरेशी आणि साकिब सलीम, तेजस्वी प्रकाश आणि करण कुंद्रा, रकुल प्रीत सिंग आणि जॅकी भगनानी, सोहा अली खान आणि सबा अली खान, अपारशक्ती खुराना आणि आकृती खुराना, रिया चक्रवर्ती आणि शौविक चक्रवर्ती तसेच रसिका दुगल आणि मुकुल चड्डा यांसारख्या अनेक जोड्या पाहायला मिळणार आहेत. याशिवाय सायरस ब्रोचा आणि सायरस साहुकार हे देखील या कार्यक्रमात हजेरी लावणार आहेत.

नेहा आणि अंगद यांनी याबद्दल अधिक माहिती देताना सांगितले की, युट्यूबच्या क्षेत्रात त्यांचे हे पहिले पाऊल असून त्यांना कलाकारांसाठी एक असा सुरक्षित आणि मोकळा मंच तयार करायचा होता जिथे ते कोणत्याही दबावाशिवाय मनमोकळेपणाने वागू शकतील. दर गुरुवारी या मालिकेचा नवीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# परिणीती बनली ब्रँड ॲम्बेसिडर

अभिनेत्री परिणीती चोप्रा हिची 'जॉन्सन बेबी' या नामांकित ब्रँडची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे. परिणीती ही या ब्रँडशी जोडली गेलेली पहिली सेलिब्रिटी ॲम्बेसेडर ठरली आहे. या भागीदारीबद्दल बोलताना तिने सांगितले की, अशा प्रतिष्ठित ब्रँडचा भाग होणे तिच्यासाठी सन्मानाची बाब आहे. तिने यावेळी तिच्या स्वतःच्या लहानपणीच्या आठवणींनाही उजाळा दिला. परिणीतीच्या या नवीन भूमिकेमुळे ब्रँडची लोकप्रियता अधिक वाढण्यास मदत होईल, असा विश्वास कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.



# 'पेद्दी'चा संगीत अनावरण सोहळा

राम चरण आणि जान्हवी कपूर यांची मुख्य भूमिका असलेल्या 'पेद्दी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या प्रदर्शनाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनचा एक भाग म्हणून निर्मात्यांनी संगीत अनावरण सोहळ्याची घोषणा केली असून हा सोहळा २३ मे २०२६ रोजी भोपाळमध्ये रंगणार आहे. या विशेष सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे जागतिक कीर्तीचे संगीतकार ए. आर. रहमान हे या कार्यक्रमात थेट सादरीकरण करणार आहेत. निर्मात्यांनी सोशल मीडियावर एक प्रोमो व्हिडिओ शेअर करत ही माहिती दिली असून 'साऊंड ऑफ पेद्दी' भोपाळमध्ये घुमणार असल्याचे म्हटले आहे. यापूर्वी चित्रपटातील 'चिकिरी चिकिरी' आणि 'राय राय रा रा' ही दोन गाणी प्रदर्शित झाली असून त्यांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शनाच्या नियोजनात काही बदल करण्यात आले आहेत. बुची बाबू सना यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले



असून यामध्ये शिव राजकुमार, जगपती बाबू आणि दिव्येंदू शर्मा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट ४ जून २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार आहे.

# हेली शाहच्या 'लंडन डायरीज'

अभिनेत्री हेली शाह सध्या लंडनमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत असून तिचे तेथील फोटो सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरले आहेत. हेलीने तिच्या लंडन सहलीतील काही विशेष क्षण चाहत्यांसोबत शेअर केले असून तिची 'लंडन डायरीज' प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. या सहलीदरम्यान हेली विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत असून तिने शेअर केलेले फोटो एखाद्या पोस्टकार्डसारखे सुंदर दिसत आहेत. केवळ निसर्गसौंदर्यच नाही, तर हेलीच्या स्टायलिश पेहरावांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. लंडनच्या थंड वातावरणात तिने परिधान केलेले ट्रेंडी कपडे आणि तिचा वावर यामुळे तिचे फॅशन सेन्स पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

हेली शाहने यापूर्वी अनेक लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिकांमध्ये काम केले असून तिने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्येही आपली उपस्थिती दर्शवली होती. लंडनच्या रस्त्यांवर फिरतानाचे तिचे हे फोटो सध्या इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर पाहिले जात असून चाहते तिच्या फोटोंवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत.



# वासु भगनानी लढाई जिंकली...

प्रसिद्ध निर्माते वासु भगनानी यांच्या 'पूजा एंटरटेनमेंट'ने आपल्या चित्रपटांच्या बौद्धिक संपदा अधिकारांच्या (आयपी) संरक्षणासाठी न्यायालयात महत्त्वाची कायदेशीर लढाई जिंकली आहे. बिहारमधील कटिहार येथील दिवाणी न्यायालयाने 'टिप्स म्युझिक' आणि इतर संबंधित पक्षांविरुद्ध अंतरीम आदेश देताना 'जैसे थे' परिस्थिती राखण्याचे निर्देश दिले आहेत. हा निकाल संपूर्ण चित्रपट निर्मात्यांच्या समुदायासाठी एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.

हा खटला प्रामुख्याने पूजा एंटरटेनमेंटच्या 'कुली नंबर १', 'हिरो नंबर १', 'बीवी नंबर १' (१९९९), 'बडे मियाँ छोटे मियाँ' (१९९८) आणि 'मुझे कुछ कहना है' (२००१) यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांच्या हक्कांच्या अनधिकृत वापराशी संबंधित आहे. तसेच, आगामी चित्रपट 'हाय जवानी तो इश्क होना है' याच्या प्रदर्शनावरही या आदेशाचा परिणाम होणार आहे. या चित्रपटांचे संगीत, ध्वनी मुद्रण आणि इतर बौद्धिक संपदेचा स्ट्रीमिंग, ब्रॉडकास्टिंग आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर परवानगीशिवाय व्यावसायिक वापर केला जात असल्याचा दावा पूजा एंटरटेनमेंटने केला होता. न्यायालयाने नमूद केले की, पूजा एंटरटेनमेंटला तातडीने दिलासा दिला नाही, तर त्यांच्या वैधानिक हक्कांचे कधीही भरून न येणारे नुकसान होऊ शकते. या निकालामुळे जुन्या चित्रपटांचे हक्क आणि त्यांच्याशी संबंधित इतर अधिकार मालकाच्या परवानगीशिवाय वापरता येणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.





# मध्य प्रदेश हायकोर्टात ओबीसी आरक्षणावर अंतिम सुनावणी सुरू

■ भोपाळ

**इतर** मागासवर्गिय (ओबीसी) प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या ८६ याचिकांवर मध्य प्रदेश उच्च न्यायालयात कालपासून अंतिम सुनावणी सुरू झाली आहे.मुख्य न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि न्या.विनय सराफ यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी सुरू आहे.

कालच्या सुनावणीत ज्येष्ठ वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सोहनी खटल्यात दिलेल्या निकालाचा दाखला देत केवळ लोकसंख्या वाढली या आधारावर ओबीसी आरक्षणाच्या टक्केवारीत वाढ करणे न्यायाच्या तत्वाला मान्य नाही.मध्य प्रदेश सरकारने २०१९ मध्ये ओबीसी आरक्षणाची टक्केवारी २७ टक्क्यांपर्यंत वाढवली होती. सरकारच्या या निर्णयाला अशिता दुबे आणि इतरांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.या एकूण ८६ याचिकांवर एकत्रित सुनावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे.

# तैवान मुद्यावर संबंध बिघडतील! जिनपिंग यांचा ट्रम्पना इशारा

■ बीजिंग

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डॉनाल्ड ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात बीजिंगमध्ये झालेली उच्चस्तरीय बैठक जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. व्यापारयुद्ध, तंत्रज्ञान स्पर्धा आणि वाढती भू-राजकीय अस्थिरता या पार्श्वभूमीवर झालेल्या या चर्चेत दोन्ही देशांनी सहकार्य वाढवण्याचे आणि संबंध स्थिर ठेवण्याचे संकेत दिले. मात्र तैवान बाबत भूमिका मांडताना शी जिनपिंग यांनी ट्रम्प इशारा दिला की तैवान मुद्दा चुकीच्या पद्धतीने हाताळल्यास दोन्ही देशांतील संबंध गंभीर धोक्यात येऊ शकतात.

या बैठकीतून अमेरिका-चीन संबंधांच्या भविष्यास आकार देणारे अनेक महत्त्वाचे मुद्दे समोर आले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा नऊ वर्षांनंतरचा चीन दौरा सर्वाधिक लक्षवेधी ठरला आहे. बीजिंगमध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग यांनी ट्रम्प यांचे भव्य स्वागत केले. ग्रेट हॉल ऑफ द पीपल येथे झालेल्या या स्वागत समारंभात लाल गालिचा, लष्करी सन्मान, चिनी लष्करी बँडने वाजवलेले अमेरिकेचे राष्ट्रगीत आणि पॉम्पॉम्स हलवत आनंद व्यक्त करणारी शालेय मुले यांचा समावेश होता. या भव्य आणि मैत्रीपूर्ण स्वागतामुळे या उच्चस्तरीय शिखर बैठकीची सकारात्मक सुरुवात झाली.ही बैठक व्यापार, तंत्रज्ञान, तैवान आणि वाढत्या जागतिक अस्थिरतेवर केंद्रित होती. शी जिनपिंग यांनी चर्चेची सुरुवात संघर्षाऐवजी सहकार्यावर भर देत केली.

## सायबर हेरगिरीचा धोका

डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीन दौऱ्यात त्यांच्या शिष्टमंडळाला डिजिटल लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. एलॉन मस्क, टिम कुक यांसारखे सीईओ आणि अमेरिकन अधिकारी वैयक्तिक मोबाईल व लॅपटॉप वापरणे टाळून तात्पुरती स्वच्छ उपकरणे वापरत आहेत, जेणेकरून चीनी देखरेख आणि संभाव्य हॅकिंग टाळता येईल. सुरक्षेच्या कारणास्तव स्थानिक चार्जिंग सुविधा न वापरण्याचा सल्लाही देण्यात आला असून, विशेष सुरक्षित उपकरणे आणि पूर्व-तपासलेले चार्जिंग पॅक वापरले जात आहेत. या उपकरणांची प्रवासानंतर सुरक्षा तपासणीही केली जाते. अमेरिकेच्या मते चीनमध्ये सायबर हेरगिरीचा धोका जास्त आहे, तर चीनने हे आरोप फेटाळले आहेत.

# चट्टोपाध्याय आयोगानुसार आश्रमशाळा शिक्षकांना वेतनश्रेणीचा लाभ

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील शिक्षकांसाठी निर्णय घेतला. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी देत उच्च माध्यमिक शिक्षकांना १२ आणि २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारसीनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना आर्थिक लाभ मिळणार असून त्यांच्या सेवेला प्रोत्साहन मिळेल. दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना वेतनवाढीसह पदोन्नतीसदृश लाभ मिळाल्याने त्यांच्या आर्थिक स्थैर्यात वाढ होणार आहे.

# अंबोली-वेळुंजे योजनेस ४९.२६ कोटींची मंजुरी

■ मुंबई

**मुख्यमंत्रीदेवेंद्र** फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नाशिक जिल्ह्यातील मधील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजना प्रकल्पासाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली. जलसंपदा विभागांतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजनेमुळे परिसरातील जलसाठा आणि सिंचन व्यवस्थेला फायदा होणार असल्याचे सरकारने सांगितले. बैठकीत पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयांमधील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरण लागू करण्याचा निर्णय झाला.

यानुसार राज्यातील सहा मोठ्या प्रकल्पांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. तसेच धरणांचे जतन आणि संवर्धनही शक्य होणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले.

# दिल्ली कार बॉम्बस्फोट प्रकरणात एनआयएचे ७५०० पानांचे आरोपपत्र

■ नवी दिल्ली

**एनआयएने** राजधानी दिल्लीला हादरवून टाकणाऱ्या लाल किल्ला परिसरातील कार बॉम्बस्फोट प्रकरणात तब्बल ७५०० पानांचे आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले. १० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या भीषण स्फोटात ११ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण गंभीर जखमी झाले होते. दिल्लीतील पटियाला हाऊस येथील एनआयए विशेष न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रात १० आरोपींचा समावेश आहे. यामध्ये हा देशाविरुद्ध रचलेला मोठा दहशतवादी कट असल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला.

एनआयएच्या माहितीनुसार, सर्व आरोपी दहशतवादी संघटना अन्सार गजवत-उल-हिंद आणि अल-कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंटशी संबंधित होते. या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. उमर उन नबी हा पुलवामाचा रहिवासी असून तो हरियाणातील अल-फलाह विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत होता. त्याचा मृत्यू झाला आहे.

आरोपपत्रात आमिर रशीद मीर, जासिर बिलाल वानी, डॉ. मुजम्मिल शकील, डॉ. आदिल अहमद राठर, डॉ. शाहीन सईद, मुफ्ती इरफान अहमद वागे, सोयब, डॉ. बिलाल नसीर मल्ला आणि यासिर अहमद डार यांच्यासह इतर आरोपींची नावे नमूद करण्यात आली आहेत. तपासादरम्यान जम्मू-काश्मीर, हरियाणा,



उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत दहशतवादी नेटवर्क कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. एनआयएने ५८८ साक्षीदारांचे जबाब, ३९५ हून अधिक कागदपत्रे आणि २०० पेक्षा अधिक जप्त वस्तू पुरावा म्हणून सादर केल्या. आरोपी कट्टरपंथी विचारसरणीने प्रभावित झालेले उच्चशिक्षित वैद्यकीय व्यावसायिक असल्याचे तपासात स्पष्ट झाले. २०२२ मध्ये श्रीनगरमध्ये झालेल्या गुप्त बैठकीत एजीयूएच इंटरिम या संघटनेला पुन्हा सक्रिय करून ऑपरेशन हेवनली हिंद सुरू केल्याचा दावा एनआयएने केला.

# उत्तर प्रदेशात वादळ-पावसाचा कहर

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशमध्ये गेल्या ४८ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली. राज्यातील विविध भागांत झालेल्या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत १०४ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो जण जखमी झाले आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये घरे, जनावरे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

बाराबंकी, बहराइच, कानपूर देहात, बस्ती, संभल, हरदोई, उन्नाव, प्रयागराज, भदोही, मिर्झापूर आणि फतेहपूरसह १९ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा मोठा फटका बसला आहे. प्रयागराजमध्ये सर्वाधिक २१ जणांचा मृत्यू झाला असून भदोहीमध्ये १७, मिर्झापूरमध्ये १५ आणि फतेहपूरमध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यभरात १३० हून अधिक जनावरे दगावली असून ९८ घरांचे नुकसान झाल्याची नोंद आहे.

## १०४ जणांचा मृत्यू

वादळामुळे राज्यातील २ हजारांहून अधिक गावांमधील वीजपुरवठा खंडित झाला. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, विजेचे खांब कोसळले आणि भिंती ढासळल्याने वाहनांचे नुकसान झाले. गाझियाबाद, वाराणसी, अयोध्या, मथुरा, उन्नाव आणि प्रयागराजसह ३० जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसासह गारपीट झाली.

# पाकिस्तानी गँगस्टर भट्टीचे राज्यातील नेटवर्क उद्ध्वस्त

■ नवी दिल्ली

**पाकिस्तानी** गँगस्टर शहजाद भट्टी याचा भारतात दहशत पसरवण्याच्या कट उघडकीस आला आहे. सुरक्षा यंत्रणांनी एकाच वेळी अनेक ठिकाणी धाड टाकून डझनभर लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. अनेक केंद्रीय व राज्य यंत्रणांनी महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत व्यापक छापेमारी करून एका कथित स्लीपर सेल मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. यात सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्म आणि डार्क वेबच्या माध्यमातून भारतीय युवकांना समील करण्याचा कट उघड झाला आहे. पाकिस्तान सीमेपासून महराष्ट्र, दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह इतर ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.



महाराष्ट्र एटीएसने मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, कल्याण, भंडारा आणि चंद्रपूरसह राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये ५० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी धाड टाकली. या कारवाईत आतापर्यंत ५७ हून अधिक लोकांची चौकशी सुरू आहे. तपास यंत्रणांचा दावा आहे की हे सर्व युवक इंटरनेट आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे शहजाद भट्टी गँगच्या संपर्कात आले होते आणि त्यांना भारतातील संवेदनशील ठिकाणांशी संबंधित माहिती गोळा करण्यासाठी वापरले जात होते. संशयितांना सैन्य ठिकाणे, महत्त्वाच्या सरकारी इमारती, सार्वजनिक स्थळे आणि इतर संवेदनशील पायाभूत हे नेटवर्क लहान-लहान मॉड्युलर सेल्समध्ये काम करत होते. म्हणजे एका गटाला दुसऱ्या गटाच्या हालचाली किंवा ओळखीची माहिती दिली जात नव्हती, जेणेकरून एखादा सदस्य पकडला गेला तरी संपूर्ण नेटवर्क उघड होऊ नये.

# जो हिंदू मस्तानीला घरी आणेल त्याला एक लाख रुपये रोख

■ पुणे

## मिलिंद एकबोटेंचे वक्तव्य

**पुणे** जिल्ह्यातील नारायणगाव येथे आयोजित कार्यक्रमात समस्त हिंदू आघाडीचे अध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी केलेल्या वक्तव्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकबोटे यांनी लव्ह जिहाद संदर्भ देत, जो हिंदू मस्तानीला (मुस्लिम मुलीला) घरी आणेल त्याला एक लाख रुपये रोख आणि चांदीचे कडे देणार असे म्हटले आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमादरम्यान एकबोटे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीचे अभिषेक व शंभू महापूजा करण्यात आली. त्यानंतर ते म्हणाले की, जर मुसलमान लव्ह जिहाद करत असतील, तर हिंदूंनी बाजीराव-मस्तानी केले पाहिजे. जो हिंदू मस्तानीला घरी आणेल, त्याला एक लाख रुपये रोख आणि चांदीचे कडे बक्षीस देऊ.


# हडपसरमध्ये मध्यरात्री खळबळ रुग्णालयाशेजारी 'टायमर बॉम्ब'

■ पुणे

**पुणे** शहरातील हडपसर परिसर काल मध्यरात्री हादरून गेला. येथील कामधेनू इस्टेटमधील सुपर स्पेशालिस्ट खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाजवळील पुरुष स्वच्छतागृहात जिलेटिनच्या कांड्या, सर्किट आणि डिजिटल टायमर जोडलेली संशयास्पद वस्तू सापडल्याने रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांमध्ये घबराट माजली. घटनेची माहिती मिळताच पुणे पोलीस, बॉम्ब शोधक व नाशक पथक , अग्निशमन दल आणि एटीएस यांनी घटनास्थळी धाव घेत परिसराची नाकेबंदी केली.

तपासात ही वस्तू लो-ग्रेड आयईडी म्हणजे कमी तीव्रतेचा बॉम्ब असल्याचे निष्पन्न झाले.त्यामध्ये सात तासांचा टायमर सेट केला होता. स्वच्छता कर्मचाऱ्याला सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास ही वस्तू आढळली. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने तातडीने पोलिसांना माहिती दिली. रुग्णालयातील डॉ. विलास गायकवाड यांनी प्रसंगावधान राखत संशयास्पद वस्तू बाहेर सुरक्षित ठिकाणी हलवली. त्यानंतर बॉम्ब शोधक पथकाने ती वस्तू हडपसर येथील ग्लायडिंग सेंटरच्या मैदानात नेऊन नियंत्रित स्फोटाद्वारे निकामी केली.

# नवाकाळ शब्दकोडे-१६०६



**आडवे शब्द –**

१. ललाट ३. गांधीजींचा आश्रम या नदीकाठी आहे ७. सत्यनारायणाच्या पोथीतला व्यापारी १०. शांत, निःशब्द १३. चिकार १५. जंगल, शेत १६. स्तुतिपाठक १७. मुद्दाम १९. प्रसिद्ध कवी मोरोपंत यांचे काव्य २२. गायीचे पिल्लू २४. चुन्याबरोबर विडा रंगवणारा २५. अभिनेता २६. त्याप्रमाणे २८. नवरा ३०. रडक्या चेहऱ्याचा, डोळे भरून आलेला ३२. प्रचलित ३४. पोपट ३७. वस्तू, पर्वत ४०. सर्वात धाकटे मूल ४१. सदस्य ४३. मग्न ४४. किमया ४५. लक्षावधी ४६. कॉर्पोरेटर ४८. अनेकमजली वास्तु ५१. तोंड ५२. एक जलचर ५४. कंडू ५६. खुंटी, वर्म ५७. जमीन कसून उपजीविका करणारा ५९. पूर्वग्रह ६०. निष्ठावंत ६३. शिकाऱ्याचे लक्ष्य ६५. खिशात मावणारे आणि तोंडाने वाजवता येणारे वाद्य ६६. ढिला, ढगळा ६७. सुखरूप ६८. चटकन चपखल उत्तर देणारा ७१. अरुंद बोळ ७३. नाशिकजवळचे शक्तीपीठ ७४. जोडीदार ७५. किनारा, काठ ७६. ढग ७८. आमंत्रण ८१. अंगलट, ठेवण ८३. सार्वजनिक वाहतुकीचे मोठे वाहन ८६. तंबूचे कापड ८८. किंचित ८९. हातचलाखीचे जादूचे खेळ ९२. टपाल ९४. गाढव ९५. अयोध्या १००. किंवा १०२. घरात बाळगण्याजोगे प्राणी १०४. 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे .....' समर्थ रामदास १०६. प्रवास १०७. पाणी १०८. रानरेडा १०९. लाकूड, कोळसे इ. सरपणविक्रीचे दुकान ११०. ढोकळा

**उभे शब्द –**

२. निरीक्षण, अवलोकन ४. उत्कर्ष ५. ताकद, जोर, जोम ६. मातीचे भांडे ८. जबाबदारी ९. शंका, अनिश्चितता १०. व्यवस्थित ११. चैत्रातील ऋतू १२. पुच्छ १४. संसार १६. संत एकनाथांच्या समाजप्रबोधन करणाऱ्या रचना १७. दक्ष १८. जंगल २०. श्रीकृष्ण २१. फेब्रुवारीत एकोणतीस दिवस असलेले वर्ष २३. माळ, बरोबरी २४. मिश्रण, खिचडी २७. आश्रय २९. दत्ताची मुखे ३१. गावाची शीव ३३. गलोल ३५. दुसऱ्या देशात अनधिकृत प्रवेश करून राहणारा ३६. प्रसन्न चेहऱ्याचा ३८. अतिशय भयभीत ३९. नाशवंत ४०. मारुतीच्या मूर्तीवरचा तांबूस लेप ४२. मासे पकडून विक्रीचा व्यवसाय ४३. प्रमाद ४४. पूर्ण पोशाख ४७. नेम, व्रत ४९. पिच्छा पुरवणे ५०. मित्र ५३. बेसन लावलेल्या ताकाचा पातळ पदार्थ ५५. ज्याप्रमाणे ५६. टेबल ५७. देवळात रात्री केली जाणारी शेवटची आरती ५८. कट्टर ५९. हळूवारपणे ६०. उचित ६१. रक्तवाहिनी ६२. तरुणी ६४. वस्ती ६५. पलंग ६८. आक्षेप ६९. भीती, वचक ७०. झाडाचे उगमस्थान ७२. टोणगा ७७. लाट ७८. तोतरा ७९. जंगली ८०. साळुंकी ८२. धाक ८४. वर्ष, संवत्सर ८५. बरकत ८६. हात ८७. त्यानुसार ८८. पुत्र ९०. नामस्मरण ९१. उठाव, क्रांती ९३. गोंगाट ९४. कष्टमय ९६. कितीतरी ९७. सावकाश ९८. प्रेरणादायी गीते रचणारा व गाणारा ९९. फर्मान १००. सवाष्ण १०१. दिवस १०२. चांगल्या-वाईटाची जाण, कदर १०३. वागण्या-बोलण्याची रीत १०४. बकरी १०५. झोपमोड •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. अक्कलशून्य ४. संकेत ८. सोमरस १२. वर १४. वरदविनायक १७. रवाना १९. डबोले २०. जिरेसाळ २२. रदबदली २४. शकल २७. वायस २९. वात ३०. तीज ३२. डबीर ३४. उबग ३५. कवडी ३६. रोग ३८. चारठाव ३९. वक्तशीर ४१. कळी ४२. निब ४३. टवाळ ४५. सहजी ४७. विडी ४८. वजा ५१. स्वार ५२. वडिलोपार्जित ५४. रूपांतर ५६. जर्मनी ५८. डाग ६०. नम्र ६१. कवन ६३. गजरा ६५. वळू ६७. निंदा ६८. मंदिर ७०. नवती ७१. बहुत ७३. उदास ७५. रवी ७७. तवा ७९. नेकी ८१. शिसा ८२. दास ८४. आमराई ८६. वजा ८७. साव ८९. महाग ९०. गीतकार ९२. श्वसन ९४. जावई ९६. वश ९७. पार ९८. काष्ठ ९९. माकड १०१. बाकी १०२. सल १०३. हर १०४. वावडी १०५. खास १०६. डर १०८. सलवार कमीज १११. घायाळ ११२. पोज ११३. आगामी ११४. मस ११५. नरमाई ११६. तीनतेरा वाजणे

**उभे शब्द** : १. अखंड स्थितीचा निर्धारू श्रीमंत योगी २. लवलेश ३. शूर ५. केवळ ६. तर ७. रवि ८. सोय ९. मकर १०. सरबत ११. मनाली १३. खरे १५. दर्भ १६. नालायक १८. वाद २०. जिलबी २१. साध्य २३. दवा २५. कडवट २६. अंबर २८. सवड ३१. जरब ३३. रवळ ३४. उशीर ३७. गमजा ४०. तह ४१. कडीपाट ४४. वाटी ४५. सरडा ४६. जीव ४७. विलो ४८. वतनदार ४९. पतकर ५०. कूर्मगतीने ५३. डिकी ५५. रव ५७. नीज ५९. गवत ६२. नन ६४. राब ६६. पैदा ६९. दिवा ७२. हुर्रेवडी ७३. उसासा ७४. सदा ७६. वीरगती ७८. समर ८०. कीर्तनकार ८३. समई ८४. आकाश ८५. ईश्वर ८८. वजा ९१. तवकील ९३. काकडी ९५. वडस ९७. पालक ९९. मावळती १००. रडगाणे १०१. बासरी १०२. तरस १०३. हजर १०४. वाया १०५. खाजरा १०७. रमी १०९. वाम ११०. मीन १११. घाई ११२. पोते ११३. आज

# कोकणातील आंबा- काजू उत्पादक अडचणीत

पान १ वरून

औषधाचा उपाय झाला नाही आणि मोहोर करपून गेला आणि फळ आले नाही.

**प्रश्न - यावर्षी किती नुकसान झाले?**

**उत्तर** - यावर्षीच्या हंगामात हवामानबदलामुळे कोकणातील आंबा - काजू या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन प्रचंड नुकसान झाले आहे. मोठ्या शेतकऱ्यांचे ९० टक्के तर अल्पभूधारक शेतकऱ्यांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. आंब्याशिवाय काजू, सुपारी अशा सर्व उत्पादनाला फटका बसला आहे.

**प्रश्न - मुंबईतील मोर्चात तुमच्या काय मागण्या असतील?**

**उत्तर** - आंबा उत्पादनाला १ हेक्टरी ५ लाख रुपये तर काजू उत्पादनाला हेक्टरी ३ लाख रुपये भरपाई मिळावी. म्हणजे आंब्याच्या एका कलमाला कमीत कमी ५ हजार आणि आणि काजूच्या एका कलमाला ३ हजार रुपये शासनाने दिले पाहिजे. कारण एका कलमाच्या मशागतीला जवळपास ५ हजार खर्च येतो. सरकारने पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील चौदा जिल्ह्यांना कर्जमाफी जाहीर केली आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी कोकणातील जिल्ह्यांनाही कर्जमाफी दिली पाहिजे. नियमानुसार ३१ जून नंतर कर्ज थकीत होते. त्यानंतर शासनाची कर्जमाफी लागू होणार आहे. कोकणातील शेतकऱ्याचे कर्ज जास्त प्रमाणात थकित नसते. त्यामुळे आमचे चालू वर्षाचे कर्ज तरी माफ करावे. त्याचबरोबर उत्पादनाला योग्य हमीभाव मिळावा अशी आमची मागणी आहे. गोवा सरकार काजूला २०० रुपयांचा हमीभाव देते आहे तसाच निर्णय महाराष्ट्र शासनाने घ्यावा.

**प्रश्न - आतापर्यंतच्या नुकसानीचे पंचनामे झाले आहेत का?**

**उत्तर** - शासनाने १३ एप्रिलला पंचनामे करण्यासाठी परिपत्रक काढले होते. महिनाभरात आजपर्यंत त्यांनी केवळ २५ टक्के पंचनामे पूर्ण केले आहेत. उर्वरित ६५ टक्के पंचनामे बाकी आहेत. अधिकाऱ्यांनी येत्या १० दिवसांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मात्र एवढ्या कमी वेळात ते कसे पूर्ण होणार याबाबत आम्हाला प्रश्न आहे. त्यामुळे त्यासाठी शासनाने वेळ वाढवून द्यावी, अशी आमची मागणी आहे.

**प्रश्न - पीकविमा योजनेचा आंबा उत्पादकांना किती फायदा होतो?**

**उत्तर** - पीकविमा योजनेचा आंबा उत्पादकाला काहीच फायदा होत नाही. कारण त्या निकषांमध्ये कोकणातील आंबा - काजू उत्पादन बसत नाही. कोकणात उंच सखल भाग असल्यामुळे पाऊस पडण्याचे



प्रमाण प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहे. मात्र शेतकऱ्याचे नुकसान सगळीकडेच होते. त्यामुळे अनेक वेळा केवळ ५ हजार रुपयांचा पिकविमा मिळाल्याचे उदाहरण आहे.

**प्रश्न - कोकणात फळ येण्याआधी बाग विकलेली असते. यामध्ये नुकसान नक्की कोणाचे होते?**

**उत्तर** - काही लोक उत्पादन काढत नाही. त्या बागा ते वर्षाच्या करारावर व्यापाऱ्याला देतात. त्या व्यापाऱ्याने बागमालकाला पैसे पूर्ण दिलेले असतात. त्यामुळे त्यांना तोटा नाही. करार झाला की व्यापारी पिकाची मशागत करून काळजी घेतो. त्यांना फळ आले नाही तर प्रचंड नुकसान होते.

**प्रश्न - हवामानबदलामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभाग संशोधन करतात का ?**

**उत्तर** - बाळासाहेब सावंत दापोली कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत वेंगुर्ला, विजयदुर्ग येथे उपकेंद्र आहेत. पण पंधरा वीस वर्षांत कोणतेच संशोधन केलेले नाही. आंब्यावर कोणतेही खास औषध किंवा कीटकनाशक नाही. आम्ही द्राक्ष, मिरची किंवा इतर फळांसाठी वापरले जाणारे किटकनाशक आंब्यावर वापरतो. शेतकरी जीवामृत, गोमुत्र असे सेंद्रिय उपाय करतात. पण ते १०० टक्के लागू होत नाही. काही लोकांकडे दहा हजार कलमाच्या बागा आहेत. त्यासाठीच्या सेंद्रिय फवारणीला वेळ पुरत नाही.

**प्रश्न - उद्याच्या मोर्चाचे नियोजन कसे असणार आहे?**

**उत्तर** - काल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री आणि पुनर्वसन मंत्र्यांसोबत बैठक झाली. त्यांनी आम्हाला सहकार्य करण्याचे आश्वासन देत मोर्चा न काढण्यास सांगितले. मात्र त्यांनी एका कलमाला २२० रुपये मदतीचा प्रस्ताव देऊन उत्पादकांची थट्टा केली. आम्ही गेल्या ३ महिन्यांपासून आंदोलन करत आहोत. मात्र सरकारने दखल घेतली नाही. त्यांना आम्ही आज ११ वाजता पर्यंतची मुदत दिली होती. परंतु कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे आम्ही मुंबईत मोर्चा काढणार आहोत. या आंदोलनासाठी आम्हाला उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, जनता दल, कम्युनिस्ट पक्ष या पक्षांनी पाठिंबा दिला आहे. आमच्या मोर्चाला परवानगी नाही. मात्र आम्ही आंदोलनावर ठाम आहोत. दोन ते अडीच हजार आंदोलक यामध्ये सहभागी होणार आहेत. मोर्चानंतर सायंकाळी ५ वाजता शिवालय येथे पत्रकार परिषद होईल.

# मे महिन्यातच देवगड हापूस हंगाम अखेरच्या टप्प्यात

**उत्पादनात मोठी घट**

देवगड

**निसर्गाचा** लहरीपणा, अवकाळी पाऊस व रोगांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देवगडचा जगप्रसिद्ध हापूस आंबा यंदा मे महिन्यातच हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात पोहोचला आहे. पुढील काहीच दिवस हा सुगंधी व चवदार आंबा बाजारात उपलब्ध राहणार असल्याची माहिती बागायतदारांकडून मिळत आहे. यंदा हवामानातील बदल व फळमाशीच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. परिणामी बाजारातील आवक कमी झाली असून बागायतदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. देवगड हापूसच्या नावाखाली कर्नाटकातील आंब्यांची विक्री वाढल्याने ग्राहकांनी विश्वासू विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी, असे आवाहन बागायतदार आणि आंबा व्यापार संघटनांकडून करण्यात आले आहे.

# ज्ञानेश्वर माऊलींचा मुक्काम भवानी पेठेतच

पान १ वरून - पालिका पालखी मार्गावरील अतिक्रमणे हटवण्याचे काम करत असून, पालखी सोहळा सुरक्षित आणि निर्विघ्न पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भवानी पेठेतील अपुरी जागा, दर्शन रांगेतील ऊन-पावसाचा त्रास आणि पार्किंग सुविधांचा अभाव यामुळे २०१० पासून पालखी मुक्काम रेसकोर्स मैदानावर हलवण्याची मागणी सुरू होती. याच पार्श्वभूमीवर संस्थान कमिटीने १३ एप्रिल २०२६ रोजी नियोजित बैठकही रद्द केली होती. यावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह स्थानिक नेत्यांनी प्रयत्न केला. पुणे पालिकेने यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली असून, ३१ मेपर्यंत आवश्यक जागा ताब्यात घेण्याचे आश्वासन दिले. दरम्यान यावर्षी पालखी सोहळा ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आळंदी येथून प्रस्थान करणार आहे. ९ आणि १० जुलै रोजी पालखीचा मुक्काम पुण्यातील भवानी पेठेत होणार आहे.

# जंतरमंतर रोडवरील बंगला आमचा! काँग्रेसची याचिका

पान १ वरून

काँग्रेसच्या वतीने युक्तिवाद करताना ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांनी हा बंगला अन्य कोणाला देण्यापासून सरकारला रोखावे, अशी विनंती केली. तथापि न्यायाधीश पुरुषैंद्र कुमार कौरव यांनी या रिट याचिकेच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित केला. याचिका सुनावणीस पात्र आहे याची न्यायालयाला खात्री पटवून दिल्याशिवाय आम्ही सरकारला कोणताही आदेश देणार नाही, असे न्या. कौरव यांनी सांगितले. या प्रकरणी पुढील सुनावणी सप्टेंबरमध्ये होणार आहे.

# राहुल गांधींचे ५४ परदेश दौरे

पान १ वरून

२०२२-२३ या दहा वर्षांत राहुल गांधी यांचे घोषित उत्पन्न सुमारे ११ कोटी रुपये होते. मात्र, त्यांच्या परदेश दौऱ्यांवर जवळपास ६० कोटी रुपये खर्च झाला. राहुल गांधींनी कमाईपेक्षा जास्त खर्च केला. मग या दौऱ्यांचा खर्च नेमका कोणी केला? परदेश दौऱ्यांचा खर्च एखाद्या परदेशी संस्थेने उचलला असेल, तर एफसीआरएच्या तरतुदी लागू होतात. तो वैयक्तिक खर्च असेल तर त्याची आयकर विवरणात नोंद असणे आवश्यक आहे.

# केरळ मुख्यमंत्रिपदी सतीशन यांचे नाव

पान ८ वरून

व्ही. डी. सतीशन हे केरळ विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून अभ्यासू नेते म्हणून ओळखले जातात. पिनराई विजयन सरकारविरोधात त्यांनी सातत्याने आक्रमक भूमिका घेतली होती. केवळ आरोप न करता आकडेवारी आणि पुराव्यांसह मुद्दे मांडण्याची त्यांची शैली लोकप्रिय ठरली.

२०२६ च्या विधानसभा निवडणुकीत विखुरलेल्या विरोधकांना एकत्र आणून युडीएफला १४० पैकी १०२ जागांवर विजय मिळवून देण्याचे मोठे श्रेय त्यांच्या रणनीतीला दिले जात आहे. काँग्रेसला ६३ जागा मिळाल्या असून हा विजय पक्षासाठी ऐतिहासिक मानला जात आहे. व्ही. डी. सतीशन यांनी काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयुआयमधून राजकीय प्रवासाला सुरुवात केली. २००१ पासून परवूर मतदारसंघातून ते सलग ६ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. २०२१ ते २०२६ या काळात विरोधी पक्षनेते म्हणून काम करताना सरकारला अनेकदा अडचणीत आणले. सतीशन यांनी केरळ उच्च न्यायालयात दहा वर्षे वकिलीही केली आहे.

**सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाति समाज, मुंबई**
सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह मार्ग, मुंबई – ४०० ०२८
स्थापना–1845 रजि. क्र. ए.74 मुंबई

पात्र सभासद मतदारास असे कळविण्यात येते की, उपरोक्त समाजाच्या विश्वस्त मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक **रविवार, दिनांक १७ मे २०२६** रोजी **सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत** संस्थेच्या सभागृहात होणार आहे. तरी आपण मतदानास हजर रहावे ही विनंती

स्थळ: सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाति समाज, मुंबई
सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह मार्ग, वीर सावरकर मार्ग, दादर (प), मुंबई – ४०० ०२८

चिटणीस
सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाति समाज, मुंबई
बीवायपी

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
Municipal Bank Bhavan, 245,
P. D' Mello Road, Fort, Mumbai –400 001
TEL: +91-22-2271 7800/879
EMAIL: mcbank@mcbmumbai.com/ estate@mcb.bank.in

**TENDER NOTICE**

The Municipal Co-Op. Bank Ltd., Mumbai has invites sealed **tenders for "Tender Document -Supply, Installation & Commissioning of Air Conditioners and Buy Back of Existing Air conditioners"**
Tender documents shall be downloaded from the bank's website: **www.mcb.bank.in** from 15/05/2026. Last date and time for submission of Tender : On or Before 20/05/2026 up to 5.00 PM

Place: Mumbai
Date:14/05/2026
Sd/-
General Manager

# मंत्र्यांचा इंधनबचतीचा दिखावा! फडणवीसांचा बुलेट प्रवास

पान १ वरून

सर्व्हिसिंगसुद्धा झाली. वाहन प्रणालीवर ९ ते १८ मे पर्यंत कामकाज बंद असल्याने त्यांनी हे वाहन पर्यावरणीय दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्रसुद्धा आधीच घेतले होते. जनतेच्या मनातून उतरलेली काँग्रेस आता कागदपत्रांमधील तांत्रिक बाबींवरून स्वस्त प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. वर्षाताईंनी ट्वीट करण्यापूर्वी सत्य पडताळून पाहिले असते, तर स्वतःचीच फजिती टळली असती. मूळ प्रश्न आपण पंतप्रधान महोदयांच्या आवाहनाला प्रतिसाद देणार की नाही हा आहे. त्याचे उत्तर आधी द्या. तोवर इधर-उधर की बात ना कर.

भाजपा - काँग्रेसमध्ये हा वाद चालू असतानाच मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली. इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी दोघांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर सुरू केला. एकनाथ शिंदे यांची एमजी कंपनीची लाखो रुपयांची महागडी गाडी आहे. इलेक्ट्रिक गाड्यांची किंमत ७ ते ७० लाखांपर्यंत आहे. इंधन बचतीच्या नावाखाली नेते आता या महागड्या गाड्या सरकारी पैशाने विकत घेत सुटले आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्याला येऊन आज संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची पाहणी खासगी पर्यटन कंपनीच्या बसने प्रवास करून केली. या बसमध्ये त्यांच्यासह फक्त पत्रकार आणि सुरक्षा रक्षक होते. त्या बसच्या मागे त्यांचा पाच गाड्यांचा ताफा होता. पुणे प्रशासनाला आपल्या सुरक्षा ताफ्यातील वाहनांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या होत्या. तरीही इतका बडेजाव होता. मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे हे मंत्रालयाच्या अगदी समोर असलेल्या 'सुवर्णगड' या आपल्या शासकीय निवासस्थानापासून मंत्रालयापर्यंतचे ५ मिनिटांचे अंतर पायी चालत गेले. मंत्री गिरीश महाजन व रवींद्र चव्हाण यांनी मात्र मुंबई ते नाशिक हा विमान प्रवास चार्टर्ड विमानाने केला. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी त्याचे फोटो पोस्ट करत टीका केली की, महाराष्ट्रवासीयांनो बघा, आदरणीय पंतप्रधान आणि मुख्यमंत्री साहेबांच्या आवाहनानंतर कशी छान काटकसर सुरू आहे! बहुतेक यांची विमाने हवेतल्या ऑक्सिजनवर उडत असावीत.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या सुचनेनुसार राज्याचे सचिव राजेश अगरवाल यांनी इंधन बचतीबाबत एक नियमावली जाहीर केली आहे.

सरकारच्या नव्या आदेशानुसार मुख्यमंत्री आणि सर्वच मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. परगावी होणाऱ्या दौऱ्यांदरम्यान निश्चित मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरली जाणार नाहीत, अशी स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे. मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रस्तावित परदेश दौरे रद्द करण्यात आले असून, पुढील काही महिन्यांत नव्या दौऱ्यांना मंजुरी दिली जाणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. विशेष विमान किंवा हेलिकॉप्टरचा वापर टाळून नियमित विमानसेवेचा वापर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. याशिवाय, आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा सार्वजनिक बसने प्रवास करणे मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. शासकीय कार्यालयांमध्ये शक्य तिथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर करावा, कार्यालयीन कामासाठी इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य द्यावे आणि कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांनी 'कारपूलिंग'चा अवलंब करावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, संगणक आणि वातानुकूलित यंत्रणा बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, एसीचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअसदरम्यान ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. पुढील सहा महिन्यांत नवीन सल्लागार नेमणुका न करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली सरकारप्रमाणे आता महाराष्ट्र सरकारही आठवड्यात दोन दिवस 'वर्क फ्रॉम होम'चा निर्णय घेते का याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**राजारामबापू सहकारी बँक लि.; पेठ (शेड्युल्ड बँक)**
RSB
वसुली विभाग, प्रधान कार्यालय, पेठ. ता. वाळवा, जि. सांगली. पिन कोड ४१५४०७.
फोन नं. ०२३४२-२५२१३१
ई-मेल recovery@rajarambapu.bank.in

**स्थावर मालमत्ता विक्रीची जाहीर नोटीस**

बँकेची मालकी हक्क असणारी खालील तपशीलातील स्थावर मालमत्ता विक्री करणेची आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**

जिल्हा मुंबई ता. कुर्ला. कुर्ला अंधेरी रोड, मौजे मोहीली येथील उपजिल्हा निबंधक कुर्ला. यांचे अधिकार क्षेत्रातील म्युनिसिपल कॉर्पोरेशन ग्रेटर मुंबई यांचे हद्दीतील सर्व्हे नं. ६३८/३ व सर्व्हे नं. ४६ हिस्सा क्र. २(भाग), सर्व्हे नं.६२ हिस्सा नं. ७(भाग), सर्व्हे नं.४६ हिस्सा नं. ५ ई आणि सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १(भाग) याचे बिगर शेती झालेली जमीन क्षेत्र ३४५५.७ चौ. मी. यावर उभारण्यात आलेल्या "दि बिझनेस बे" या कमर्शियल बिल्डींग मधील खालील प्रमाणे युनिट

१) दुसऱ्या मजल्यावरील कमर्शियल युनिट नं. ३ याचे क्षेत्र ५०१२ चौ.फुट (कारपेट)
२) चौथ्या मजल्यावरील कमर्शियल युनिट नं. ३ याचे क्षेत्र ५०१२ चौ.फुट (कारपेट)

तरी इच्छुक खरेदीदारांनी खरेदी प्रस्ताव dadar@rajarambapu.bank.in व recovery@rajarambapu.bank.in या मेल आयडी वरती पाठवावा. संपर्कसाठी मोबाईल नं. ९५६१०००८३० व ९८६०६००९०१

चेअरमन
राजारामबापू सह. बँक लि., पेठ (शेड्युल्ड बँक)
ता. वाळवा जि. सांगली

नवाकाल
• पुणे | शुक्रवार १५ मे, २०२६ • पान -८

# यंदा रिझर्व्ह बँक सरकारला विक्रमी ३.१६ लाख कोटींचा लाभांश देणार



**मुंबई -** यावर्षी देशाची मध्यवर्ती बँक असलेली रिझर्व्ह बँक केंद्र सरकारला विक्रमी लाभांश देण्याची शक्यता आहे. ज्यामुळे सरकारला मध्य पूर्वेतील संघर्षामुळे आलेल्या संकटाचा सामना करण्यासाठी मोठी आर्थिक मदत मिळणार आहे. मागील २०२४-२५ या आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेने सरकारला २.६९ लाख कोटी रुपये लाभांश दिला होता. ही रक्कम त्याआधीच्या वर्षातील २.११ लाख कोटी रुपयांच्या तुलनेने २७ टक्के जास्त होती. तोपर्यंतचा तो विक्रमी लाभांश होता. मात्र यंदा त्याहूनही जास्त म्हणजेच ३.१६ लाख कोटी रुपये लाभांश मिळणे अपेक्षित आहे. हा नवा विक्रम ठरणार आहे.

# नाशिक जगापेक्षा वेगळे आहे, साहेब



**कुंभ स्पेशल आयुक्त शेखर सिंग काल त्याना नदीपात्रात सिमेंटचे पक्के काम करू नका सांगायला गेलेल्या पर्यावरणवादी गटाला म्हणाले... तुमचं नाशिक काय जगावेगळं आहे का? भारतात सगळीकडे बांधलेत तसेच घाट बांधतोय... एवढंच नव्हे तर लंडनच्या नदीवर पण असेच घाट आहेत म्हणे! तुमचं नाशिक काय मंगळावर आहे की व्हिनसवर?**

**मुळात** हे असं बोलणं अशा मोठ्या पदावरच्या व्यक्तीला शोभते का? शिवाय ते ही वाक्ये एकदा दोनदा नव्हे तर किमान दहा वेळा बोलले. किंबहुना त्यांच्या एकूण बोलण्याचा सारच हा होता.

जेव्हा ते म्हणाले की, तुमचं नाशिक काय मंगळ किंवा व्हिनसवर आहे का? तेव्हा माझी म्हणजे अलकाची सटकली. तुम्ही असं बोलू शकत नाही असा आवाज लावल्यावर सोबत असलेल्या मानसी, अंकुश इत्यादींनीही कालवा केला. तेव्हा त्यांनी ते वाक्य मागे घेतलं.



अर्थात हे बोलणं टिझिंग होतं. याचाच अर्थ हे शहर तुम्हाला आपलं वाटत नाही. वेगळं वाटत नाही.

साहेब कुठे तुलना करताय?? एक तर थेट लंडन, नाहीतर मग थेट युपीशी...??

असे प्रशासन अशी सत्ता..।

एक तर झाडं तोड, नदी पात्रात बांधकाम या गोष्टींना कोर्टाची मनाई असलेली कामे हे लोक बिन दिक्कत करत आहेत.

त्यांच्या या बोलण्यावर पर्यावरणाला वाहून घेतलेल्या, त्यातला अभ्यास असलेल्या मनीष बाविस्करने लिहिलेली पोस्ट... यांनीच याचिका दाखल करून नाशिकमध्ये वृक्षतोडीला जून पर्यंत स्टे मिळवला आहे.

नाशिक जगापेक्षा काही वेगळे आहे का? मा. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंग साहेबांचा पर्यावरण प्रेमींना प्रश्न.

विदेशात नदीकाठच्या घाटांना Reverfront Development म्हणतात तर भारतात घाट. नाशिक वेगळे कसे. शेखर सिंग साहेबांचा प्रश्न. समाजातील सर्व घटकांना सोबत घेत रावणाच्या दृष्ट प्रवृतींचा नायनाट करण्याचा रस्ता या नाशिक नगरीतूनच जातो. प्रभू श्रीरामचंद्र सीतामाईसह वनवासासाठी ज्या पावन नगरीत आले. आई गोदा वाहणारी गोदेकाठी पंचवटी, कपिला काठी तपोवन असणारी (Reverfront Development) नाशिक भूमी नक्कीच वेगळी आहे. साहेबा!

PIL 176/2012

प्रदूषणमुक्त गोदालाट, अतिक्रमण मुक्त गोदावाट, कॉंक्रिटमुक्त गोदाघाट, वृक्षसंपन्न गोदाकाठ असा उच्च न्यायालयाचा आदेश असणारी नाशिक नगरी जगापेक्षा वेगळी आहे. साहेबा!

**मनीष बाविस्कर**

मोका बघून शतायू वटवृक्षांना धोका म्हणणारे तथाकथित समाजरतन जरी या शहरात असले तरी वृक्षदेवतेच्या सन्मानासाठी वृक्षांसाठी काहीपण करणारे नाशिककर या शहरात असल्याने नाशिक वेगळे आहे. साहेबा!

PIL 41/2006 C.-. 96/2014

रस्त्यावरील शतायू वृक्षांसह वाहतुकीचा सुरक्षित मार्ग काढणारी एकमेवाद्वित याचिका असणारे नाशिक व नाशिककर जगापेक्षा वेगळे आहे. साहेबा!

नदी डोंगर वृक्षसंपदा हीच नाशिकची खरी ओळख. पर्यावरण वाचवा नाशिक वाचवा. जय नाशिक! तय नाशिक.

# कथित आर्थिक घोटाळ्यात दीपक कोचर यांना दिलासा

■ मुंबई

**आयसीआयसीआय** बँकेशी संबंधित कथित गैरव्यवहारप्रकरणी व्यावसायिक दीपक कोचर यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. कोचर यांची ७८ कोटींची मालमत्ता जप्त करण्याच्या अंमलबजावणी संचलनालयाच्या (ईडी) आदेशाला उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली.

मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. दीपक कोचर हे आयसीआयसीआय बँकेच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) चंदा कोचर यांचे पती आहेत. या कथित गैरव्यवहार प्रकरणी चंदा कोचर आणि दीपक कोचर यांना अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली होती. चंदा कोचर आयसीआयसीआय बँकेच्या सीईओपदी असताना २००९ ते २०१२ या कालावधीत व्हिडिओकॉन समूहातील कंपन्यांना १ हजार ८७५ कोटी रुपयांची ६ कर्जे मंजूर करण्यात आली होती.

# २८ मेपर्यंत तपास सीबीआयकडे द्या रोहित पवारांचे सुनेत्रा पवारांना आव्हान

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणी पुन्हा लावून धरत राज्य सरकारवर टीका केली. त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना २८ मेपर्यंत या अपघाताचा तपास सीबीआयकडे देण्यास मित्रपक्षाला भाग पडण्याचे आव्हान एक्स पोस्ट द्वारे केले आहे.

रोहित पवार यांनी एक्सवर लिहिले की, अजितदादांच्या विमान अपघाताचा तपास सीबीआयकडे देण्याबाबतचे पत्र आणि नंतर स्मरणपत्र



उपमुख्यमंत्री सुनेत्रा काकींनी त्यांच्या मित्रपक्षाचे नेते तथा मुख्यमंत्री आणि अजितदादांचे 'मित्र' फडणवीस यांना दिले होते. नंतर अधिवेशनातही हा मुद्दा आम्ही मांडल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी यावर सकारात्मक उत्तर दिले. पण अजितदादांना जाऊन येत्या २८ तारखेला ४ महिने होत आहेत. तरी अद्यापही हा तपास सीबीआयकडे दिलेला नाही. त्यामुळे माझे सुनेत्राकाकींना आवाहन म्हणा, आव्हान म्हणा किंवा विनंती म्हणा की त्यांनी येत्या २८ मे पर्यंत हा तपास सीबीआयकडे देण्यास त्यांच्या मित्रपक्षाला भाग पाडावे. यानिमित्ताने त्यांचा मित्रपक्ष हा खरंच मित्र आहे की मित्रपक्षालाच गिळणारा अजगरी वृत्तीचा आणखी कुणी आहे, हे स्पष्ट होईल.

# सिंहस्थ कुंभमेळासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी! मुख्यमंत्र्यांची घोषणा

■ मुंबई

**नाशिक-त्र्यंबकेश्वर** सिंहस्थ कुंभमेळात आखाड्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी. याशिवाय छोट्या संस्थानसाठी प्रति संस्थान १५ लाख रुपये तसेच आखाड्यांच्या वीज देयकाची भरणा प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्याचे तसेच आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे काल आयोजित बैठकीत सिंहस्थ



कुंभमेळाच्या तयारीचा आढावा घेतला. त्यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, कुंभमेळ्यासाठी जगभरातून येणाऱ्या साधू, महंत आणि भाविक यांची सेवा करीत त्यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात येईल. साधू, महंतांनी जे चांगले काम करीत आहे, त्याचे कौतुक केले आहे. तसेच जे काम अधिक गतीने व परिणामकारक व्हायला पाहिजे, त्यासाठी सूचना केल्या आहेत. साधू महंतांच्या बैठकीतील चर्चेने कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी निश्चितच मदत होणार आहे. पुढील वर्षी होत असलेल्या कुंभमेळ्याचे नियोजन आणि तयारी ही केवळ याच कुंभमेळ्यासाठी नसून ती पुढील १२ वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्यासाठी असणार आहे.

# साखरेच्या निर्यातीवर बंदी शेतकरी नेते राजू शेट्टी नाराज

■ नवी दिल्ली

**मध्य** पूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत पुरवठ्यामध्ये खंड पडू नये म्हणून केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली आहे.

यासंदर्भात सरकारने जारी केलेल्या आदेशात ३० सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यावर बंदी लागू राहील. यामध्ये प्रक्रिया केलेल्या आणि प्रक्रिया न केलेल्या सफेद साखरेचा समावेश आहे. या आदेशातून फक्त युरोपीय समुदाय आणि अमेरिकेत विशिष्ट कोट्यातून साखरेच्या निर्यातीला सूट देण्यात आली आहे. यावर्षी साखरेचे अतिरिक्त उत्पादन होईल या अपेक्षेने सरकारने साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली होती. दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयावर महाराष्ट्रातील शेतकरी नेते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मागील चार वर्षांत केंद्र सरकारने साखरेच्या हमी भावात (एमएसपी) वाढ केलेली नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वाढला तरी साखरेचे भाव स्थिर ठेवावे लागत आहे.

# दिल्लीत बसमध्ये ३० वर्षीय महिलेवर सामूहिक अत्याचार

■ नवी दिल्ली

**दिल्ली** पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावरून हादरली आहे. राणी बाग परिसरात एका ३० वर्षीय महिलेवर चालत्या खासगी बसमध्ये सामूहिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत बस चालक आणि वाहकाला अटक केली असून बस जप्त केली आहे.

पीडित महिला मंगोलपुरी येथील एका फॅक्टरीत काम करते. सोमवारी ११ मे रोजी रात्री काम आटोपून ती पायी घरी जात असताना सरस्वती विहार बस थांब्याजवळ उभ्या असलेल्या बसजवळ तिने वेळ विचारण्यासाठी संपर्क साधला. त्यावेळी आरोपींनी तिला जबरदस्तीने बसमध्ये ओढून नेल्याचा आरोप आहे. महिलेच्या जबाबानुसार, बस सुरू करून दरवाजे बंद करण्यात आले आणि राणी बाग ते नांगलोई या दरम्यान तिच्यावर आळीपाळीने अत्याचार करण्यात आला.

सुमारे दोन तास हा प्रकार सुरू होता. त्यानंतर आरोपींनी महिलेला रस्त्यावर फेकून देत घटनास्थळावरून पळ काढला.

# ममता बॅनर्जी वकिलांचा गाऊन घालून हिंसाचार प्रकरणी न्यायालयात हजर

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बनर्जी वकिलांचा काळा गाऊन परिधान करून आज कोलकाता हायकोर्टात निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचाराच्या आरोपांशी संबंधित प्रकरणात हजर झाल्या. हे प्रकरण तृणमूलचे वरिष्ठ नेते कल्याण बॅनर्जी यांचे पुत्र शिर्षन्या बंदोपाध्याय यांनी दाखल केले आहे. विधानसभा निवडणुकांनंतर कार्यकर्ते आणि पक्ष कार्यालयांवर हल्ले झाल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे.



तृणमूल कार्यकर्त्यांवरील कथित हल्ल्यांच्या प्रकरणात बाजू मांडण्यासाठी ममता बॅनर्जी स्वतः न्यायालयात पोहोचल्या. त्यांनी काळा कोट आणि वकिलांचा गाऊन परिधान केला होता. तृणमूलचे वरिष्ठ नेते आणि वकील कल्याण बॅनर्जी यांच्यासोबत त्यांनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर आपली बाजू मांडली. ममता बॅनर्जी यांनी १९८२ मध्ये जोगेश चंद्र चॅटर्जी लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी प्राप्त केली आहे. एक्सवरील पोस्टमध्ये तृणमूल कॉँग्रेसने म्हटले की, ममता बॅनर्जी यांची न्यायालयातील उपस्थिती ही बंगालच्या जनतेप्रती त्यांची कायमची बांधिलकी दर्शवते.

# राज्यात अवकाळी पावसाने हाहाकार आठ महिन्यांच्या चिमुकल्याचा मृत्यू

■ सातारा

**राज्यातील** विविध भागांत अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत जनजीवन विस्कळीत केले आहे. वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी गारांसह झालेल्या पावसामुळे शेती, पशुधन आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. सातारा, सांगली, गोंदिया, नांदेड आणि पुणे जिल्ह्यांत या पावसाचा मोठा फटका बसला आहे.

साताऱ्यातील सदर बाजार, लक्ष्मी टेकडी परिसरात सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे सुमारे ४० घरांचे नुकसान झाले. कोंडवे गावात विजेचा तडाखा बसून १८ मेंढ्यांचा मृत्यू झाला. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात मुसळधार पावसासह वादळी वाऱ्यामुळे द्राक्ष बागांचे मोठे नुकसान झाले. खलाटी येथे आनंदा बिरू शेजुळ



शेती, घरांचे मोठे नुकसान

यांच्या घरावरील पत्रे उडून भिंत कोसळली. या दुर्घटनेत आठ महिन्यांच्या श्रीवर्धन शेजुळ या चिमुकल्याचा मृत्यू झाला.

विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांची छते उडाली. कोहमारा-नवेगावबांध मार्गावर झाडे कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली. नांदेड जिल्ह्यात सकाळीच वादळी पावसाने हजेरी लावली. जिंतूर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीत अडथळा निर्माण झाला.

# मध्य रेल्वेवर आजपासून सलग तीन दिवस रात्रकालीन ब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या विद्याविहार स्थानकातील मध्यवर्ती पादचारी पुलाचा गर्डर बसवण्याच्या कामासाठी उद्यापासून सलग तीन दिवस रात्रकालीन विशेष पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. १५ ते १८ मे दरम्यान हे काम पार पडणार असून, कुर्ला ते भांडुप दरम्यानच्या लोकल सेवांमध्ये मोठे बदल करण्यात येणार आहेत. काही गाड्या रद्द केल्या जाणार असून, काहींचे मार्ग वळवले जाणार आहेत. यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

गर्डर लॉंचिंगचे काम तीन टप्प्यांत होणार आहे. शुक्रवारी १५ मे रोजी मध्यरात्री १.१५ ते पहाटे ४.१५, शनिवारी १६ मे रोजी रात्री १२.१० ते पहाटे ४.४० आणि रविवारी १७ मे रोजी मध्यरात्री १.१५ ते पहाटे ३.०५ या कालावधीत ब्लॉक राहील. या दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून रात्री ११.३० ते १२.१२ दरम्यान कर्जत दिशेने धावणाऱ्या धिम्या गाड्या माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान जलद मार्गावर वळवण्यात येतील. तसेच कसारा येथून रात्री १० नंतर सीएसएमटीकडे येणाऱ्या गाड्याही मुलुंड ते माटुंगा दरम्यान जलद मार्गावरून धावतील. काही गाड्यांचा प्रवास कुर्ला येथेच संपवण्यात येणार असून, अप दिशेने येणाऱ्या काही गाड्या ठाणे येथे थांबवण्यात येतील.

# एचएसआरपी प्लेटसाठी मुदतवाढ ३० जूनपर्यंत शेवटची संधी

**१ जुलैपासून तपासणी मोहीम**

■ मुंबई

**राज्यातील** वाहनांची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी आणि ओळख प्रक्रिया पारदर्शक करण्याच्या उद्देशाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेसाठी देण्यात आलेली ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत आता वाढवून ३० जून २०२६ करण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यात एचएसआरपी बसवण्याच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी एचएसआरपी अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जुन्या वाहनांनाही ही प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी.

# वाराणशीच्या सोनारांकडून झालमुडी विकून निषेध

■ वाराणसी

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी एक वर्ष सोने खरेदी न करण्याच्या केलेल्या आवाहनामुळे देशभरातील सराफा व्यापाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. विविध शहरांमध्ये सराफा व्यापारी आणि सोन्याचे दागिने घडवणारे कारागीर मोदींच्या या आवाहनाला विरोध करत आहेत. वाराणशीतील सुवर्णकारांनी काल झालमुडी विकून अनोख्या प्रकारे मोदींच्या आवाहनाचा निषेध केला. मध्य पूर्वेतील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटात विदेशी चलन वाचवण्यासाठी गेल्या रविवारी पंतप्रधान मोदींनी देशाच्या जनतेला काटकसर करण्याचे आवाहन केले. पेट्रोल-डिझेल, स्वयंपाकाचा गॅस आणि खाद्यतेलाचा वापर कमी करा आणि किमान एक वर्ष सोने खरेदी करू नका, असे मोदींनी सांगितले होते. मोदींच्या या आवाहनाचा सर्वात मोठा फटका देशातील सराफा उद्योगाला बसणार आहे.

# १० दिवसांच्या गोंधळानंतर केरळ मुख्यमंत्रिपदी सतीशन यांचे नाव

**दहा दिवसांच्या गोंधळानंतर काँग्रेसने अखेर केरळच्या मुख्यमंत्रिपदासाठी व्ही. डी. सतीशन यांच्या नावाची घोषणा केली. विधानसभा निवडणुकीत दहा वर्षांनंतर सत्तेत पुनरागमन करणाऱ्या काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू होती.**

■ तिरुअनंतपूरम

**के. सी. वेणुगोपाल** आणि रमेश चेन्नीथला यांची नावेही चर्चेत



होती. मात्र ४ मे रोजी निकाल लागल्यानंतर बहुमत असूनही अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसने मुख्यमंत्र्यांचे नावच जाहीर केले नव्हते. काँग्रेस हायकमांडने लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि वरिष्ठ नेत्यांच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

काल रात्रीच्या ४० मिनिटे झालेल्या बैठकीनंतर सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. » पान ७ वर

**वेणुगोपाल मुख्यमंत्री झाल्यास वायनाड विसरा**

वेणुगोपाल मुख्यमंत्री होण्याच्या चर्चेनंतर राहुल गांधींच्या वायनाड मतदारसंघात धुसफूस सुरू झाली. या पार्श्वभूमीवर गांधींना इशारा देणारे पोस्टर वायनाडमध्ये जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाबाहेर झळकले. मिस्टर राहुल आणि प्रियांका, वायनाड विसरा. तुम्ही पुन्हा येथून विजयी होणार नाही. मिस्टर राहुल, के. सी कदाचित तुमच्या बॅगा उचलत असतील. पण, केरळची जनता तुम्हाला माफ करणार नाही. आरजी, पीजी हा इशारा नाही. केरळ राहुल आणि प्रियांका गांधी यांचे मूर्खपणाचे निर्णय मान्य करणार नाही, असा मजकूर त्यावर आहे.

# जळगावात उष्णतेचा कहर २० वर्षीय नवविवाहितेचा मृत्यू

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे उष्माघाताचे प्रकार वाढत असून, २० वर्षीय नवविवाहिता आणि आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे जामनेर आणि चोपडा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. जामनेर तालुक्यातील मोहाडी येथील वैशाली सुनील भील (मोरे) हिचा उष्माघाताने मृत्यू झाला. २३ एप्रिल रोजी तिचा विवाह झाला होता. ११ मे रोजी त्या पतीसोबत चोपडा तालुक्यातील खामखेडा येथे नातेवाईकांच्या लग्नासाठी गेली होती. लग्न समारंभ आटोपून परतल्यानंतर तिला थकवा जाणवू लागला. दुपारी दोनच्या सुमारास तिला अचानक ताप आला आणि चक्कर येऊन ती कोसळली. कुटुंबियांनी त्यांना तातडीने नेरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने जळगाव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलवण्याचा सल्ला देण्यात आला.